म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. ८७९५



म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
लेखक हरि बल्लाळ परचुरे
सन १८९६
पुस्तकाचें नांव गोपाळ गणेश आगरकर यांचें चरित्र
वाचनालय क्रमांक १५५३

१५.२
ह. ब्रि.
चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

प्रि. गोपाळ गणेश आगरकर एम्. ए.



जन्म १८५६. मृत्यु १८९५.

क्षीरसागर यांची उपयुक्त पुस्तकमाला.

नंबर १.

प्रिन्सिपॉल

# गोपाळ गणेश आगरकर, एम. ए.,

यांचें

# चरित्र.

रा. रा. हरी बल्लाळ परचुरे, बी. ए.,

यांनीं लिहिलें तें

यशवंत बाळकृष्ण क्षीरसागर

यांनीं

छापून प्रसिद्ध केलें.

सर्व प्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.

आक्टोबर सन १८९६.

किंमत ४ आणे.

मुंबईंत
"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

हें पुस्तक

न्यू इंग्लिश स्कूल आणि फरग्युसन कॉलेजच्या

**चालकांस, विद्यार्थ्यांस**

व

**सुधारक पत्राच्या आश्रयदात्यांस**

त्यांचें

रा. रा. आगरकर यांजवर असलेलें

निस्सीम प्रेम पाहून

त्यांस

अर्पण केलें आहे.

प्रकाशक.

६.२४०

# उपोद्घात.

Lives of great men all remind us,
We can make our lives sublime.

Psalm of Life ;—*Longfellow*.

अनेक देशांमध्यें जे थोर पुरुष होऊन जातात त्यांचीं चरित्रें आपण पाहिल्यानें, तीं वाचल्यानें, तीं सदा डोळ्यांपुढें ठेविल्यानें जो अनुपम लाभ होतो तो हा कीं, आपल्यास एक प्रकारची महत्वाकांक्षा उत्पन्न होते. आपलें चरित्रही त्यांसारखें होईल असे आपण प्रयत्न करूं लागतों. सारांश, 'आपण त्यांच्या समान होऊं' हाच आपणांस बोध मिळतो. पण सर्व थोर पुरुषांचीं चरित्रें आपणांस मिळणें मुष्कील असतें, करितां जीं थोडीं पहावयास, वाचावयास सांपडतील तीं तरी अवश्य वाचावीं. थोर पुरुष कोणाला ह्मणावें याची व्याख्या करण्याची येथें गरज नाहीं. जे पुरुष आपापल्या मतांप्रमाणें खऱ्या प्रामाणिकपणानें, खऱ्या कळकळीनें, खऱ्या देशभक्तीनें देशसेवा करितात ते थोर असें ह्मटलें असतां कोणीही हरकत घेणार नाहीं. अशा दृष्टीनें पाहतां कै. प्रि. **गोपाळ गणेश आगरकर** हे एक थोर पुरुष होऊन गेले व त्यांचें चरित्र जर आपणांस वाचावयास मिळेल तर पुष्कळ लाभ होतील यांत संशय नाहीं. याच हेतूच्या पूर्ती-

करितां हें **गोपाळरावजींचें त्रोटक चरित्र** आज लिहिण्याचें योजिलें आहे.*

या पुरुषाचीं अल्प चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. पण त्या सर्वांचा हेतु बहुतेक मृत्युलेख लिहितांना त्या व्यक्तीची माहिती द्यावी या पलिकडे विशेष नाहीं. प्रस्तुतच्या लेखांतही त्यांनीं दिलेल्या पेक्षां विशेष माहिती देतां येईल असें नाहीं. परंतु वर्तमानपत्रांत किंवा मासिक पुस्तकांत दिलेल्या चरित्रापेक्षां अशा स्वतंत्र रीतीनें लिहिलेल्या चरित्रांत चरित्रलेखकास जे फायदे मिळतात त्यायोगें हें चरित्र जास्त उपदेशपर होण्याचा संभव आहे. चरित्र लिहितांना मोठी अडचण पडते ती माहिती मिळवण्याची व मिळालेली माहिती कितपत खरी आहे हें समजण्याची. शिवाय चरित्रनायकाच्या पिढीचीं मनुष्यें जीवंत असतांना चरित्र लिहिण्याचें काम करावें लागलें असतां त्या चरित्राला एकदेशियपणाचें दूषण लागण्याचा विशेष संभव असतो; त्यांतही विशेषतः चरित्रनायकाच्या वेळेपासून लोकांत दोन पक्ष होऊन राहिले असले तर तें दूषण कोणत्या तरी एका पक्षाकडून–उलट पक्षाकडून–दिलें जाणारच जाणार. असो. या सर्व अडचणी सोसून हें कृत्य आरंभिलें आहे. आतां तें कसें काय उतरलें आहे व व्हावा तसा त्याचा उपयोग होईल कीं नाहीं हें ठरविण्याचें काम माझें नव्हें; तें वाचकांचें आहे, तेव्हां ते तें करतीलच.

---

*थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचें पहा जरा ।
आपण त्यांच्या समान होऊं हाच सांपडे बोध खरा ॥

जीवितमहात्म्य.

इ-५ (ओ)

प्रिन्सिपॉल

# गोपाळ गणेश आगरकर, एम्. ए., यांचें चरित्र.

सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाडच्या ईशान्येस तीन मैलांवर कृष्णेच्या पलिकडे टेंभू म्हणून लहानसें खेडें आहे. येथें ब्राह्मणवस्ती फारशी नाहीं; पण आहे त्यांत देशस्थ ब्राह्मणांचीं घरें जास्त आहेत, जीं काय पांच सहा कोंकणस्थ घराणीं आहेत. त्यांमध्यें बच्याजीपंतांचें घराणें प्रसिद्ध आहे. या घराण्याचें मूळ ठिकाण कोंकणांत आगर म्हणून गांव आहे त्यावरूनच यांचें नांव आगरकर असें पडलें असावें. कोंकणांतल्या कोंकणांत कित्येक घराण्यांनीं वारंवार स्थलांतरें केलेलीं आहेत व हे कोंकणस्थ लोक स्थलांतरें करितां करितां देशांत बहुतेक दूर-वर पसरून राहिलेले आहेत. मारवाडी, गुजराथी आणि कोंकणस्थ या तीन जाति आमच्या देशांत स्थलांतर करण्यामध्यें पटाईत, पण त्यांतल्या त्यांत कोंकणस्थ लोक स्थलांतर करून पूर्वस्थलाभिमान सोडून परकीय स्थलीं वसाहतच करितात.

जन्मस्थान, कूळ व जन्म.

असो. बच्याजीपंत अगर त्यांचे वडिल हे प्रथमतः टेंभूस आले. येण्यास कारण काय हें कळत नाहीं; पण इतर कोंकणस्थ घराण्यांप्रमाणेंच उदरनिर्वाहाचें साधन शोधीत ते इकडे आले असावे. बच्याजीपंतांचें घराणें म्हणजे पहिल्यापासून सुशील, सत्यप्रिय, सरळ व बालबोध अशी ख्याती आहे. शिवाय हें घराणें खाऊनपिऊन सुखी, इतकेंच नव्हे, तर संपन्न असें मानलें जात असे. गांवांत जीं

काय चारपांच देवालयें आहेत त्यांत लक्ष्मीनारायणाचें देवालय या **बच्याजीपंतांनीं**च बांधलें असें ह्मणतात.* या देवालयास सालिना ७५ रुपये उत्पन्न आहे व वहिवाट याच घराण्यांत आहे. असें दिसतें कीं **बच्याजीपंतांनीं** बराच पैसा मिळवून घराण्याची सुस्थिति केली.† **बच्याजीपंतांच्या** दोन मुलांपैकीं वडिल **विष्णुपंत** यांनीं वडिलांची संपत्ति सरासरी राखली; परंतु त्यांचे दुसरे चिरंजीव **गणेशपंत** ऊर्फ **गणुअप्पा** यांनीं ती घालविली. आजा मिळवितो व नातू खर्च करितो ही गोष्ट येथेंही खरी झाली. **गणेशपंत** म्हणजे दुर्व्यसनी होते असें नव्हे. पण 'आलस्योहि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः' या कव्युक्तीप्रमाणें एक आळस असला ह्मणजे आणखी कोणतें व्यसन नाश करायाला पाहिजे? **गणेशपंतांच्या** निरुद्योगीपणामुळेंच **गणेशपंतांस** गरिबी आली. तरी **गणेशपंतांचें** लग्न चांगल्या स्थितींत झालें होतें. **गणेशपंतांचे** वडिल बंधु **लक्ष्मणपंत** हे कारकुनीचें काम करीत व त्यांवरच ते हयात होते तोंपर्यंत सर्व कुटुंबभार होता. इकडे **कऱ्हाडांतच भागवत** ह्मणून एक प्रसिद्ध घराणें आहे. यांच्या घराण्यांतील पुरुषांनीं पेशवाईंत मामलती केलेल्या आहेत. या लौकिकवान् घराण्याशीं **गणेशपंतांचा** संबंध झाला. **विष्णुपंत भागवत** यांची वडिल कन्या **ठकू** ही **गणेशपंतांस** दिली होती. **गणुअप्पा** व **सरस्वती** (हें ठकूचें सासरचें नांव) **काकू** यांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम असे. उभयतां सरळस्वभावाचीं, प्रामाणिक, सत्यप्रिय, प्रेमळ, देवभक्त

---

* देवाची मूर्ति काळ्या पाषाणाची असून गरुडावर आरूढ झालेली आहे. या सुंदर व भव्य मंदिराला तसाच भव्य व विस्तीर्ण सभामंडप असून सभोंवतीं उंच चुनेगची तट आहे व महाद्वारावर नगारखाना आहे; शिखर अतिशय उंच असून त्याचें काम अप्रतिम आहे. प्रत्येक मजल्यांत अनेक कमानी असून त्यांमध्यें निरनिराळ्या पौराणिक मूर्ति बसविलेल्या आहेत. एकंदर देवालयाचा देखावा पाहून मन प्रफुल्लित होऊन जातें.

† या गोष्टीची साक्ष वरील लक्ष्मीनारायणाचें देवालय व त्यांचा विस्तीर्ण भव्य व सभोंवार उंच तट आहे असा वाडा हीं देतात.

च साधींभोळीं माणसें होतीं.* देवाची पूजाअर्चा करणें व त्याकरितां सामानसुमान जमविणें यांतच बहुतेक वेळ तीं घालवीत. **गणुअप्पांनीं** संस्कृत अभ्यास केलेला होता; तें पुराण सांगत व कधीं कधीं कीर्तन करीत. **सरस्वतीकाकू** कवयित्री होत्या. त्यांना गाणीं करण्याला फारसा वेळ लागत नसे. त्यांचीं सर्व गाणीं देवासंबंधानें मात्र असत. हीं रसभरीत गाणीं त्या प्रांतांतील पुष्कळ स्त्रियांच्या तोंडीं आहेत. हें भक्तिपरायण दंपत्य आपला काळ परस्पर प्रेमांत व देवसेवेंत घालवीत असतां त्यांना तीन पुत्र व तीन चार कन्या झाल्या. मुली लहानपणींच लग्न होण्यापूर्वी वारल्या. घरांत गरिबी असल्यामुळें **सरस्वतीबाईचें** प्रत्येक बाळंतपण त्यांच्या माहेरींच झालें. आधींच आईची लेंकीवर प्रीति जास्त असते, शिवाय त्या लेंकीची जर गरीबी असेल तर तिजकडे आईचा विशेषच ओढा असतो; यामुळें **सरस्वतीबाईच्या** आईनें त्यांचीं सर्व बाळंतपणें करावीं हें साहजिकच झालें.

बरोबर चाळीस वर्षांपूर्वीं ह्मणजे इ० सन १८५६ त **गणुअप्पांस** दुसरा मुलगा झाला. तिकडे हिंदुस्थानांत त्या वेळीं राजकीय प्रकरणीं सर्व देशास खळबळून टाकणारा जो प्रळय मातला होता त्याचें कारण उत्पन्न झालें होतें. व त्याचा संबंध दूरवर पोंचविला ह्मणजे **महाराष्ट्र** व **सातारा** इकडे पोंचतो. इकडे **महाराष्ट्रांत सातारा** जिल्ह्यांतच पुढें सामाजिक प्रकरणीं **महाराष्ट्रास**—कदाचित् सर्व देशास—हालवणारें हें कारण जन्मास आलें. या मुलाचें नांव **गोपाळ** असें ठेविलें. **गोपाळ** आपल्या इतर भावंडांप्रमाणेंच आपल्या आजोळींच लहानाचा मोठा झाला. बाळंतपणानंतर कांहीं दिवस **सरस्वतीबाई टेंभूस** व कांहीं दिवस माहेरीं राहात

---

* यांच्या देवभक्तीविषयीं पुढील गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे लक्ष्मीनारायणाचा सभामंडप मोडकळीस आला तेव्हां तो नीट करावा असें **गणुअप्पांच्या** मनांत नेहमीं असे. पण गरिबीमुळें तें काम झालें नाहीं. पण **सरस्वतीकाकूंनीं** मरणसमयीं आपल्या हातांतील सात तोळ्यांच्या पाटल्या या कामाकरितां काढून दिल्या.

असत. त्यामुळें **गोपाळरावांचे** कांहीं दिवस ह्मणजे अगदींच बालपण **टेंभूंत** गेलें खरें. पण साधारणतः सहा सात वर्षांचा मुलगा झाला म्हणजे त्याच्या शिक्षणास सुरवात होते. तेव्हां

प्राथमिक शिक्षण.

**गोपाळरावजींचें** वय शाळेंत जाण्यासारखें झाल्याबरोबर त्यांस आपला पुष्कळ काळ आईबापांपासून दूर रहावें लागलें. इतक्या लहानपणीं मातृविरह ह्मणजे खराच दुःखमय; पण दुःखांत सुख एवढेंच कीं त्यांस **टेंभू**-जवळच व आपल्या आजोळींच राहावयाचें होतें. जन्मल्या ठिकाणीं अगर आईबाप राहत असतील त्या ठिकाणीं शाळा नसणें, शिकण्याची कांहींच सोय नसणें ह्मणजे एकतर आईबापांच्या विरहाचें दुःख अनुभवावें अथवा अज्ञानांधःकारांत गढून जावें यापरता मार्ग नाहीं. बहुतेक ठिकाणीं दुसराच मार्ग धरावा लागतो. कारण इतक्या लहानपणीं मायलेंकरांची ताटातूट करणें जीवावर येतें हें एक व इतकें दुःख सोसून लेंकराची साधारणपणें काळजी घेतील असें ठिकाण मिळणें मुष्किलीचें असतें हें दुसरें. शिवाय गरिबी असली ह्मणजे तर ती दशा पुसूंच नका. पण आमच्या चरित्रनायकास इतक्याही प्रसंगांतून वर डोकें काढण्यास जागा मिळाली. आई व आजी–आईची आई–यांत आईपेक्षां आजीच कांकणभर बरी असें मुलांना वाटत असतें. आणि **टेंभू** व **कऱ्हाड** यांमध्यें **कृष्णा** नदी आडवी आहे तरी नौकासाधनानें पर्जन्यकाळींही जाण्यायेण्याची अडचण नव्हती. शिवाय मुलांना आपल्याच वयांचा सोबती असला ह्मणजे त्यांची सर्वप्रकारें मजा असते. **गोपाळरावांस** असा प्रियवयस्क पण त्याचवेळीं मिळाला व तो शेवटपर्यंत—पाठीमागेंही–त्यांचा प्रिय मित्र आहे. हा स्नेही म्हणजे त्यांचा **दत्तुमामा**. हे मामाभाचे खरे, पण समवयस्क असल्यामुळें त्या नात्यापेक्षां स्नेहाचें नातेंच त्या उभयतांस परस्पर प्रेमानें बद्ध करूं लागलें.

**गोपाळराव** व **दत्तोपंत** या जोडीचें शिक्षण बरोबर सुरु झालें व बहुतेक बरोबरच तें आटपलें. **कऱ्हाडांत** **गोपाळरावजींच्या**

वयाची बारा तेरा वर्षे गेलीं. येवढ्या अवकाशांत **गोपाळरावजींचा** इंग्रजी तीन यत्तांपर्यंत अभ्यास झाला. या लहान वयापासूनच **गोपाळरावांची** हुषारी सर्वांस महशूर झाली होती. तेथील पहिल्या नंबरच्या शाळेंत **गोपाळराव** शिकत होते. त्यावेळीं रा. रा. **नारायण मनोहर रोंधे** हे शाळेचे हेडमास्तर होते. हे शिकविण्याच्या कामांत हुषार व मेहनती असत व त्यांचा स्वभाव विनोदी असे. ते **गोपाळरावांस** कांहीं विनोदाचा प्रश्न करीत. त्याचें उत्तर **गोपाळराव** मोठ्या हुषारीनें व विनोदानें देत असत कीं जें ऐकून शिक्षकाला आनंदच व्हावा. **गोपाळरावजींचा** स्वभाव मोठा हूड असे. त्यांस दांडगाईचे व शक्तीचे खेळ खेळण्यास आवडत असत. आपल्या सौंगड्यांबरोबर वाळवंटांत हुतुतु वगैरे खेळ खेळणें, **कृष्णा कोयनांच्या** संगमांत पोहणें डुंबणें ह्या त्यांच्या सुटीच्या वेळांतील करमणुकी असत. शिवाय निबंध लिहिणें व वाचणें आणि सभेंत बोलणें हीं पण त्यांचीं या लहानपणापासूनच आवडतीं कामें होतीं. सारांश या त्यांच्या पोरवयांतच त्यांची तरतरी व तेज लोकांस दिसूं लागलें होतें.

मामाभाचे खेळखेळून, विद्याभ्यास करून, आई आजीच्या लाडांत वाढत असतां त्यांची तुटातुट होण्याचा समय आला. **कऱ्हाडचें** शिक्षण आटोपलें. तेथें जास्त अभ्यास चालेना. तेव्हां **दत्तोपंतास** त्यांच्या भावानें पुण्यास ठेविलें. इकडे **गोपाळरावांनीं** मुनसिफ कोर्टांत उमेदवारी पत्करिली. मध्यंतरीं **गोपाळरावांचे** आजोबा **विष्णुपंत भागवत** वारले. या आजोबांचा सर्वांवर व तसाच **गोपाळरावांना** बराच धाक असे. आजोबा वारल्यावर **गोपाळराव** वडील मामा **रामभाऊ** यांच्या आज्ञेंत वागत असत. उमेदवारी म्हणजे उमेद वाढवणारी नसून उमेद खचविणारी आहे. खर्डे घांशीत पडणें हें जात्या हुशार माणसाला कधींही खपावयाचें नाहीं. शिवाय **पांडुरंगपंत पाटक** (हल्लीं मुनसफ), **विठ्ठलपंत कुळकर्णी** (हल्लीं वकील, **कऱ्हाड**), **दत्तोपंतमामा** वगैरे साहाध्यायी पुढें शिकत

असतां या माणसाच्यानें मागें रखडत कसें राहवेल? बुद्धीचा मट्ठ, स्वाभिमानानें शून्य, व पडेल तो दिवस काढणारा असा हा आत्मा नव्हता. याची चलाखी, याचें ओज याची वर्चस्वाची हुरूप हीं याला माशा मारीत बसूं देईनात. त्यांनीं उमेदवारी सोडिली व **रत्नागिरीस** आपल्या एका आप्ताकडे रहाण्याचा विचार केला. त्यावेळीं **कऱ्हाडास** रा. सा. **अमृत श्रीपत नागपूरकर** हे मुनसिफ होते. त्यांनीं यांची तरतरी पूर्वींच पाहिली होती म्हणून त्यांनींही **गोपाळरावजींस** पुढें शिकण्याची भर दिली इतकेंच नव्हे, पण ७५ रुपये पदरचे काढून दिले.

**गोपाळराव रत्नागिरीस** आले हे तेथें त्यांचे चुलत चुलते डे. ए. इन्स्पेक्टर **वामनराव आगरकर** म्हणजे **गणेशपंत आगरकर** यांचे कनिष्ठ बंधु जे **कृष्णाजीपंत** त्यांचे तृतीय चिरंजीव यांचा आपल्यास आश्रय मिळेल या आशेनें गेले होते. पण **रत्नागिरीस** असतां मधुकरीवर अगर वारांवर आणि शागीर्दपणाच्या कामावर आपला निर्वाह करून **गोपाळरावांस** राहावें लागलें. तरीही **गोपाळरावजींनीं** तेथें पडेल तें काम करून व दुसऱ्यांचे कठोर व कटु वाग्बाण सोसून दिवस कंठले. विद्यार्थि ही पदवी अशाच माणसास उत्तम शोभते. कारण संकटें सोसूनही "क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्" या उपदेशाला अनुसरून तशा ठिकाणींही **गोपाळरावांनीं** दोन यत्ता साधून घेतल्या—उद्देश विद्येचा होता, अर्थाचा नव्हता, ह्मणून विद्याच साधली. इतकें केलें तरी **गोपाळरावजीं**च्यानें तेथें पुढें काळ काढवेना, काळच काढावयाचा असता तर त्यांनीं काढला असता; पण त्यांस विद्यार्जन करावयाचें होतें. त्यांची बुभुक्षा उदरासंबंधानें नव्हती. ज्ञानामृतलोलुप जो पुरुष त्याचें सर्व लक्ष्य तिकडेसच असावयाचें. इतकें काम करून व हाल सोसून आपला इष्ट हेतु सिद्धीस जात नाहीं असें कळतांच **गोपाळरावांनीं रत्नागिरीस** रामराम ठोकण्याचा निश्चय केला.

निश्चयाबरोबर ते पुन्हां **कऱ्हाडास** आले, पण 'पुढें काय' हा विचार नुसता परत येण्यानें थोडाच सुटतो. शेवटीं त्यांनीं तेथें

कांपौंडराची नोकरी पत्करिली. 'समाजाच्या रोगांचें परीक्षण करून त्यावर औषधोपचार सांगणाऱ्या या भावी सामाजिक डाक्तरास कांपौंडरीच्या चांचणींतून जावें लागलें, हें एकपरी बरें झालें ह्मणावयाचें!' येथें ही **गोपाळरावजी** स्थिरावले नाहींत. थोर माणसें परिस्थितीला नमून कधीं नसतात. तीं नेहमीं आपली योग्य परिस्थिति आपणांस प्राप्त होईपर्यंत झगडत असतात. परिस्थिति फिरवून ती आपलीशी करणें यांतच खरें शौर्य व उत्साह आहे. हें अतृप्त मन आपणांस उदात्त व सर्वव्यापी शिक्षणाचा संस्कार घडल्याशिवाय स्वस्थ बसेना. त्यांनीं ती नौकरी तर सोडली, इतक्यांत त्यांच्या—अथवा आमच्या देशाच्या कां ह्मणाना—सुदैवानें त्यांस विद्यार्जनाचें काम पुन्हां सुलभ झालें.

रा. रा. **सदाशिवराव भागवत**, **गोपाळरावांचे** दुसरे मामा हे याच सुमारास **वऱ्हाडांत** गेले. ( हल्लींही ते तिकडेच आहेत ). तेव्हां **सदाशिवरावांनीं** आपला बंधु व भाचा यांसही शिकावयाकरितां तिकडे **अकोल्यास** नेलें. व तेथें सुमारें दोन वर्षें आपल्या प्रिय मित्राच्या संगतींत राहून **गोपाळरावांनीं** अभ्यास केला. सन १८७५ सालीं ह्मणजे वयाच्या १९ व्या वर्षी ते व **दत्तोपंत** प्रवेश परीक्षेंत पसार झाले.

कांहीं गोष्टी व विचार.

वयानें व विद्येनें इतकी स्थिति आली ह्मणजे मनुष्याच्या कल्पना, त्याचे विचार व त्याचा स्वभाव यांविषयीं इतरांस जरी त्यावेळीं तितकी बरोबर अटकळ करितां आली नाहीं तरी त्या कल्पना, ते विचार व तो स्वभाव त्या मनुष्याच्या अंगांत मूळ धरून वाढूं लागलेले असतात, यांत बिलकूल शंका नाहीं **गोपाळरावजींचीं** मातापितरें उभयतांही सालस, सत्यवादी, सरळमार्गी, भक्तिपरायण व निस्पृह अशीं होतीं. व ते सर्व गुण **गोपाळरावजींमध्यें** उतरले होते असें त्यांचें एकंदर चरित्र समजल्यावर प्रत्येकाला वाटेल. भक्तिपरायणत्व हा गुण **गोपाळरावजींमध्यें** उतरला होता असें वाचल्याबरोबर कित्येकांनां आश्चर्य वाटेल; परंतु तें अगदीं

खरें आहे; त्याबद्दल पुढें कळेल. याशिवाय **गोपाळरावजींच्या** अंगांत दृढनिश्चयीपणा, दार्घोद्योग, स्वाभिमान हेही गुण होते. हे तीनही गुण एका उत्कृष्ट गुणाचे आनुषंगिक असतात. हा गुण ह्मणजे तेजस्विता अथवा ओज. ज्याच्या अंगीं ओज असेल त्याला दुसऱ्यानें केलेला आपला उपमर्द अथवा मानहानि किंवा दुसऱ्यानें लाविलेलें नसतें दूषण कधींही खपावयाचें नाहीं.

अगदीं लहानपणीं **गोपाळरावजी कऱ्हाडास** असतां रावसाहेब **नागपूरकर** मुनसफ यांचे आश्रयाखालीं प्रत्येक रविवारीं सभा भरत असत. व ज्या मुलाचा निबंध उत्तम ठरेल त्यास रावसाहेब रुपया दोन रुपये बक्षीस देत असत. त्यावेळा एकदा **गोपाळरावांचा** निबंध उत्तम ठाला असतां तेथील त्यावेळचे मामलेदार रा० सा० **आपासाहेब जोशी** यांनीं पाल्हाळिक भाषण करून सांगितलें कीं 'असला निबंध लिहिण्याचें मुलांचे अंगी कसलें सामर्थ्य! तीं दुसऱ्या कोणाकडून तरी लिहून घेतात. अशानें कशाचें ज्ञान वाढणार? तर ही सभा ह्मणजे केवळ पोरखेळ आहे.' हें रावसाहेब मामलेदारांचें भाषण **गोपाळरावजींस** खपलें नाहीं; व आपल्या शक्त्यनुसार त्यांनीं रावसाहेबांना चांगला सणसणीत जबाब दिला आणि सांगितलें कीं आतांच्याआतां सांगितलेल्या विषयावर येथच्या येथेंच निबंध लिहिण्यास मीं तयार आहें. सरळ, सत्यप्रिय, प्रामाणिक मनुष्याला असला लबाडीचा आरोप कोठून सहन होणार! हा स्वाभिमान स्वाभाविक तेजस्वितेचाच परिणाम होय.

जेव्हां बुद्धीला उदार शिक्षण व उदात्त विचार यांनीं संस्कार घडून मनाला वळण लागलेलें नसतें, तेव्हां स्वाभाविक ओज उर्मटपणाच्या दोषास पात्र होईल अशा रूपानें बाहेर पडत असतें. **गोपाळरावजी अकोल्याचे** शाळेंत जात असतां एकदां कांहीं कारणामुळे त्यांचा अभ्यास झाला नव्हता. तेव्हां त्यांना शाळेचे हेडमास्तर रा० रा० **विष्णुपंत माहाजनी** रागें भरून ह्मणाले "तुमच्या हातून काय अभ्यास व्हावयाचा आहे! तुम्ही असेच रखडत पडणार." तें **गोपाळरावजींस** सहन झालें नाहीं. त्यांनीं

खाडकन् जबाब दिला, "काय? रखडत पडणार? आपल्या सारखाच एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर." पुष्कळ विद्यार्थी अशीं उत्तरें देतील; पण त्यांच्या त्या उत्तरांत नुसता उर्मटपणाच दिसेल. आणि जेव्हां गोपाळरावजींनीं हें उत्तर दिलें तेव्हां तो उर्मटपणा लपला असेल असें नाहीं; पण त्यांच्या हातून पुढें झालेली कृति पाहिली म्हणजे मात्र तो उर्मटपणा नाहींसा होतो. असा उर्मटपणा नाहींसा करण्याचें अंगीं सामर्थ्य असणें हेंच ओज.

गोपाळरावजींच्या अंगीं आणखी कांहीं गुण आले होते त्यांचाही प्रादुर्भाव याच्यापूर्वींच झाला असला पाहिजे. ते गुण-म्हणजे मितव्ययीपणा आणि उसनें न घेण्याची संवय. ह्या गुणांस कारण त्यांची गरीबी व सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून राहून त्यांस बराच आयुष्याचा काळ काढावा लागला हें. हे दोनही गुण जरा मर्यादेपलिकडे गेले म्हणजे दोष होऊं लागतात; आणि अशा स्थितीमध्यें उत्पन्न झालेले हे गुण मर्यादेपलिकडे जाणेंही बरेंच साहाजिक असतें. पण मनुष्य जसजसा विद्यार्थिदशेंतून निघून गृहस्थाश्रमांत शिरल्यावर इतर लोकांशीं व्यवहार करूं लागतो तसतसे हे गुण पुन्हां आपल्या मर्यादेंत येऊं लागतात. असें सांगतात कीं गोपाळराव आपल्या मित्रमंडळीबरोबर सर्कसचा खेळ पाहाण्यास निघाले; पण वाटेंत भाड्याचे गाडींतून जाण्याचा बेत ठरला; गोपाळरावजींनीं खिसा पाहिला तों आंत पैसे आपल्या हिश्शापुरते देखील नव्हते; तेव्हां ते परत जाऊं लागले, मंडळीनें आग्रह केला, पैसे उसने देऊं लागले; पण यांनीं ऐकिलें नाहीं; शेवटीं निरुपायास्तव मंडळी यांच्याशिवाय गेली.

तसेंच एकदां ट्राममध्यें बसून चालले असतां यांच्या मित्रानें बाजूलाच तो होता म्हणून यांचेही पैसे दिले, पण रात्रौ घरीं आल्यावर गोपाळराव ते आणा की दोन आणे त्यास देऊं लागले; अर्थात्च मित्रानें घेतले नाहींत. व त्यांस सांगितलें कीं अशा रीतीनें जर तुम्ही या मुंबईत वागाल तर तुम्हांस लोक रानटी समजतील.

या गोष्टी खऱ्या असोत वा खोट्या असोत; अशा प्रकारची वागणूक त्यांच्या हातून मोठेपणीं तरी घडली नाहीं खास. त्यांच्या आंगचे हे दोन गुण त्यांच्याजवळ नसत तर इतक्या अल्प प्राप्तीवर त्यांस कधींच राहातां आलें नसतें हें मात्र निर्विवाद.

**गोपाळरावां**ची शरीरप्रकृति दांडगी या संबंधानें प्रो. **सेल्बी-साहेबांनीं**ही साक्ष दिली आहे. शिवाय त्यांच्या अंगीं एक प्रकारची धिटाई व आवेश असे. त्यांस उत्तम पोहतां येत होतें; झाडावर चढतां येत होतें; दम्यानें शेवटीं शेवटीं बेजार झाल्यावर मंडळींत बसून गोष्टी करितां करितां जेव्हां ते लहानपणची आठवण करून बोलत तेव्हां लहानपणची व त्या वेळची स्थिति यामध्यें दिसणाऱ्या विरोधानें त्यांचें त्यांसच आश्चर्य वाटे. लहानपणीं ते एकदां वानरास पिटाळून लावण्याकरितां चिंचेच्या झाडावर चढले असतां तो हुपट येऊन त्यांची त्यानें शेंडी धरली. पण हा वस्ताद गडी न भितां, न घाबरतां झाडावरच्या झाडावर त्याशीं झगडत राहिला. शेवटीं तो निघून गेला. या वेळीं जर **गोपाळराव** घाबरून गेले असते तर त्यांनां मोक्षच मिळण्याची पाळी आली होती.

आईबापांपासून यांच्यांत उतरलेला आणखी एक फार महत्वाचा गुण आहे. तो निस्पृहता हा होय. हा गुण जेव्हां पुढें विकास पावला तेव्हां **गोपाळरावजीं**च्या हातून काय काय कृत्यें घडलीं हें सांगणें म्हणजे त्यांचे बहुतेक चरित्र लिहिणें आहे; तेव्हां या गुणाचाही प्रादुर्भाव लहानपणींच झाला होता. मात्र तो ते कालेजांत असतां बराच व्यक्त झाला; एवढेंच येथें सांगितलें म्हणजे पुरे. **होळकरच्या** महाराजांस दिलेलें उत्तर व प्रत्यक्ष मातु:श्रीस पाठविलेलें पत्र योग्य स्थळीं येतीलच. सत्यप्रियता, दृढनिश्चय, दीर्घोद्योगिता, स्वाभिमान, तेजस्विता, धैर्य, निस्पृहता व भक्तिपरायणता या गुणसमुदायामध्यें सुशिक्षण व सुविचार यांची भर पडल्यामुळें खरा खरा देशाभिमान उत्पन्न झाला व म्हणूनच आज मित्तीस आपणांस हें चरित्र वंद्य झालें आहे.

उदार शिक्षण.

**गोपाळरावजी** व **दत्तोपंत** मध्यम शिक्षणाचा भाग आटोपून प्रवेशपरीक्षा पसार झाल्याचें मागें सांगितलें आहे. या वेळीं उभयतांचीं वयें १९–२० च्या सुमाराचीं होतीं. प्रवेशपरीक्षा झाल्यावर सरस्वतीच्या मंदिरांत मनुष्य विहार करण्यास योग्य झाला. असल्या विहाराविषयीं आधींच आतुर झालेला, इतकेंच नव्हे, सरस्वतीला वश करून तिचा स्वयंवृत पति होण्याची प्रतिज्ञा केलेला धीरोदात्त तरुण पुरुष जों देहली ओलांडून जातो तोंच आपले पाय मोडले असें पाहून किती तरी खिन्न होईल याची कल्पना तरी होईल काय ? साध्या धैर्याचा पुरुष तर तेथूनच परत यावयाचा; व कदाचित् आत्मत्यागासही उद्युक्त व्हावयाचा ! पण आमचे **गोपाळरावांचें** अंगीं कांहीं विलक्षण धैर्य होतें. त्यांनीं असा निश्चय केला कीं कांहीं होवो पण आपण तर सरस्वतीमंदिरांत जाऊन आपली तिच्यावरची भक्ति व प्रेम नुसत्या मुखानें तरी उच्चारायचींच.

याप्रमाणें निश्चय करून **गोपाळरावजी** पुण्यास आले. डेक्कन कॉलेज, एलफिन्स्टन कॉलेज यांची ख्याति पहिल्यापासून अजूनपर्यंत सारखी आहे. हल्लींपेक्षां त्यावेळीं कॉलेजें कमी होतीं व सरकारही शिक्षणाकडे चांगलें लक्ष्य पुरवीत होतें यामुळें सदहु कॉलेजें भरभराटींत होतीं. विद्यार्थ्यास कॉलेजांत जाण्याची किती जरी हौस असली तरी द्रव्यसाधनावांचून हें कार्य होत नसतें. कित्येक विद्यार्थी प्रवेश परीक्षा झाल्यावर निराश होऊन संसार मार्गाकडे वळून ज्या ठिकाणीं पोट भरेल त्या ठिकाणाची वाट धरतात. इंग्रजी तिसऱ्या चौथ्या यत्तेंतील किंबहुना सातव्या यत्तेंतील विद्यार्थ्यांसही वाटत असतें कीं आपण कॉलेजांत शिरून विश्वविद्यालयाच्या परीक्षा सहज पसार होऊन एकादें तरी उपपद धारण करूंच करूं. परंतु हा घोडा आणि हें मैदान अशी स्थिति झाल्यावर कितीकांचे हातपाय गळतात याचा नेहमीं अनुभव आहे. बुद्धिसामर्थ्याची गोष्ट सर्वथा सोडून दिली तरी द्रव्यसामर्थ्याभावानेंच हजारों रत्नें मातींत लोळत राहिलेलीं असतील यांत शंका

नाहीं. आमचें हें रत्नही मातीमोल झालें असतें. ज्याच्या प्राथमिक शिक्षणाचीच एवढी पंचाईत पडली होती व त्यामुळें सात ठिकाणीं ज्यास नाचावें लागलें, सातदां निराश होऊन उदर-निर्वाहाचे क्षुद्र मार्ग स्वीकारणें भाग पडलें; मामांचें घराणें नसतें अगर वडिल मामानें इतक्या मोठ्या वयांतही दीर्घ परिश्रमानें वकिलीची परीक्षा दिली नसती, किंवा **सदाशिवरावमामांस** आयत्यावेळीं सोईवार नौकरी मिळाली नसती, तर ज्याच्या मध्यम शिक्षणाची पुरती निराशाच होती, त्यानें उच्च प्रतीच्या शिक्षणाच्या हावेनें पुण्यास येऊन डेक्कन कॉलेजच्या पटावर आपलें नांव तरी एकदां चढवीन असा निश्चय धरावा व त्याप्रमाणें कृतीही करावी ह्मणजे केवढें धैर्य ! कोणी म्हणतील कीं मामाच्या जिवावर भिस्त ठेवून हें धैर्य केलें असेल. पण तसें दिसत नाहीं. या वेळीं **गोपाळराव** इतके मोठे होते कीं मामाच्यानें दोन मुलांचा कॉलेजचा खर्च चालववेल किंवा काय हें त्यांस पक्कें समजत असावें. शिवाय यांच्या वडिल बंधूंनीं मामाच्या पैशानें शिकून शेवटीं जटाधारण करून वैराग्य स्वीकारलें तेव्हां मामांची निराशा होऊन अशा मनुष्यास पैसे देणें व्यर्थ असें मामांस वाटलें होतें; ही गोष्ट खरी असेल तर **गोपाळरावां**सारखा स्वाभिमानी, निस्पृह, आवेशी तरुण मामांवर भिस्त ठेवणार नाहीं हें खास. एक स्वतःच्यावरच त्यांचा भरंवसा होता; अगर त्यांनीं जो हा निश्चय केला तो पुढचा पूर्ण विचार करून केला नव्हता; असेंच ह्मणावें लागतें. यांतील दुसरी कल्पनाच विशेष संभवनीय. **गोपाळरावां**चा आवेश, तारुण्य, धाडस आणि अजुनपर्यंतचीं त्यांचीं अशींच कृत्यें व त्यांत शेवटीं आलेल्या जयामुळें आलेला अभिमान इतक्या गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे हें केवळ वृत्तिप्रेरित कार्य होतें, विचार प्रेरित नव्हतें, असेंच ठरेल. ही वृत्तिप्रेरितता किती, कोठें व कशी चांगली अगर वाईट आहे याचें विवेचन पुढें येईल. असो.

**गोपाळरावजींनीं** कॉलेजांत नांव तर घातलेंच. त्यांनीं बरों-बर येतांना पन्नास एक रुपये रा. रा. **माहाजनी** वगैरे सद्गृहस्थां-

पासून मिळालेले आणले होते. पण ही पुंजी किती दिवस पुरणार! इतक्यांत **गोपाळरावाच्या** उद्योगशील स्वभावास उद्योग मिळाला. पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक मंडळीची जाहिरात त्यांच्या हातीं पडली. त्या समयीं **गोपाळरावजींनीं** इतकें उत्तम भाषण करून विषय खुलवून दिला कीं त्यांस पहिल्या नंबरचें ४० रुपयांचें बक्षिस मिळालें. **डेक्कन कॉलेज ग्यादरिंगनें** 'एकत्र हिंदुकुटुंबापासून फायदे व तोटे' या विषयावर उत्तम मराठी निबंध लिहिणारास ५० रुपयांचें बक्षिस लाविलें होतें तेंही या स्वारीनेंच पटकावलें. थोडी स्कॉलर्शिपही त्यांस पुढें मिळूं लागली होती; पण एकंदरींत हा महिना गेला पुढच्याची वाट काय? या टर्मची फी दिली, पुढच्या टर्मसंबंधानें काय करावें? ह्या विचारापासून **गोपाळरावजी** कधींही मुक्त झाले नाहींत. सर्व-प्रकारें इतकें दैन्य होतें कीं अंगांत घालण्यास सदरा एकच ह्मणून तो रात्रीं गुपचुप धुवून वाळवून सकाळीं अंगांत घालावा असेंही यांनीं कित्येक दिवस काढलें. एक दिवस कां होईना, पण अशा प्रकारचें दैन्य असून दिवस कंठणें ह्मणजे किती धैर्य पाहिजे? शिवाय निस्पृहता व स्वाभिमान इतका कीं कोणाजवळ तोंड वेंगा-डावयाचें नाहीं इतकेंच नव्हे; तर आपल्या दैन्याची नुसती कल्पनाही इतरांच्या मनांत येऊं द्यावयाची नाहीं! एफ्. इ. ए. च्या परिक्षेची फी देण्यास जवळ पैसा नाहीं तेव्हां रात्रीं जाग्रण करून नाटक लिहून तें विकावें व पैसे मिळवावे इतका खटाटोप यांनीं आरंभिला होता. परंतु ही गोष्ट कशी तरी कै. **केरुनाना छत्रे** हे त्या वेळीं तेथें प्रोफेसर होते त्यांच्या कानावर गेली; लागलीच त्या परोपकार पटु गरीबांच्या कनवाळूनें स्वतः फीचे पैसे भरले; व **गोपाळरावजींची** जाग्रणें व त्रास बंद पडला. **दत्तोपंत** व **गोपाळराव** यांची जोडी पास झाली. बी. ए. चा अभ्यास सुरू झाला. **गोपाळरावांस** स्कॉलर्शिप मिळाली. हा अभ्यास चालला असतांना त्यांस दोन जन्माचे सोबती मिळाले. सन १८७८ सालीं हें मित्रद्वय बी. ए. च्या परीक्षेंतही पसार झालें. येथ-

पर्यंत आज पांच वर्षें ही दुकल एकमेकांच्या संगतींत आनंद पावत होती. **दत्तोपंतांची** व **गोपाळरावांची** मैत्री जन्मापासूनची म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण हायस्कुलांतील वरच्या वरच्या वर्गांत मुलें आलीं म्हणजे त्यांस जो प्रौढपणा येतो व त्यांच्या विचारांची प्रगल्भता जी वाढते त्यायोगें सर्व प्रकारचे संबंध विचाराच्या पायावर रचले जाऊं लागतात. यामुळें हायस्कुलांतील वरच्या वरच्या वर्गापासून तों तहत कॉलेजचा अभ्यास पुरा होईपर्यंत जे मित्र राहिले त्यांची मैत्री बहुतेक अभंग म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कॉलेज सुटल्यावर आणि अगदीं लहानपणीं जे स्नेह होतात ते सर्वच क्षणभंगुर अथवा अल्पकालीन असतात असें नव्हे; पण यांपैकीं बहुतेक पहिल्यांच्या पेक्षां कमी शाश्वत म्हटलें असतां शोभेल. अशी त्यांची मैत्री परिपक्व झाल्यावर आतांपासून दोघांचा आयुष्यक्रम अगदीं निराळा झाला. **दत्तोपंत** मुंबईस एल्. एल्. बी. च्या अभ्यासाकरितां गेले; व **गोपाळराव** फेलो होऊन एम्. ए. चा अभ्यास करूं लागले. सन १८८० सालीं **गोपाळराव** एम्. ए. झाले; व त्यांनीं कॉलेज सोडिलें.

कॉलेजमध्यें असतांना व **अकोलें** येथील हायस्कुलांत असतांना **गोपाळरावांस** आणखीही कांहीं स्नेही मिळाले होते. रा. रा. **मारुतीराव लोहार** व **पांडुरंगपंत अग्निहोत्री** हे हल्लीं **वऱ्हाड** प्रांतींच आहेत. यांचा व **गोपाळरावजींचा** स्नेह हायस्कुलांत जडला. कालेजमध्यें असतांनां रा. रा. **मनोहरपंत काथवटे, उपासनी, शार्ङ्गपाणी मिरजकर,** रा. रा. **शंकरराव बापट** वगैरे त्यांचे स्नेही झाले. यांपैकीं रा. रा. **मिरजकर** व **बापट** यांचा अति परिचय झाला. **मिरजकर** आतां परलोकवासी आहेत. **शंकरराव** व **गोपाळराव** यांचा स्नेह तसाच शेवटपर्यंत कायम राहून दळणवळणही तसेंच चांगलें राहिलें होतें. कॉलेजांत असतां जे वादविवाद होत असत त्यांत **मिरजकर** व **आगरकर** यांचे बरेच वाद होत.

त्यावेळीं पुष्कळदां देशी कापड वापरण्यासंबंधानें वाद झालेले आहेत व त्यांत **आगरकरां**चा पक्ष देशी कापड वापरलेंच पाहिजे, प्रत्येकानें देशी कापड घ्यावें हा असे असें सांगतात.

कॉलेजांत असतांना त्यांना दोन जन्माचे सोबती मिळाले असें वर लिहिलें आहे. त्यांपैकीं एक प्रसिद्ध नास्तिक व बहुजन हितवादी **मिल्**साहेब यांचे ग्रंथ हे होत. कॉलेजांत असतांनाच **गोपाळरावांस** **मिल्**साहेबांच्या ग्रंथांची, अर्थात् मतांचीही, गोडी लागली. त्या वादपटु, प्रतिपक्षखंडनकुशल ग्रंथकाराचे निरनिराळ्या महत्वाच्या विषयांवरील तर्कशास्त्रानुसार केवळ विचाराच्या कसोटीनें पारखून निर्भिडपणें व स्पष्ट प्रतिपादन केलेले लेख वाचून त्याचें वेड **गोपाळरावांस** लागलें हें अगदीं यथार्थ झालें.

याच वेळीं **गोपाळरावांस** आनुवंशिक दमा सुरू झाला. बी. ए. च्या क्लासांत त्यांची व याची पहिली ओळख झाली. पण ओळख झाल्यावर या जिवलगानें त्यांनां कधींही सोडिलें नाहीं. आणि **चारुदत्तानें** दारिद्र्य मित्राला उद्देशून म्हटल्याप्रमाणें **गोपाळरावांनीं** या श्वास मित्राला " वसशी शरीरीं माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी । परंतु वाटे मज दुःख मोठें । मेल्यास मीं जाशिल सांग कोठें ॥ " असा विनोदी प्रश्न केला असतां तरी तो योग्यच झाला असता. हा दमा **गोपाळरावां**प्रमाणें त्यांच्या भावांसही आहे. **गोपाळरावांच्या** मातुःश्री व वडिल यांना उभयतांनांही हा दमा होता. **गणुअप्पांनीं** हा वडिलांपासून मिळविला होता अगर तो त्यांच्या स्वकष्टार्जित होता हें सांगतां येत नाहीं; पण **सरस्वतीकाकूंनीं** तरी तो वडिलापासूनच मिळविला होता असें कळतें.

लग्न.

कॉलेजांत असतांना दोन महत्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्या दोनही गोष्टींनीं **गोपाळरावांस** आपला आयुष्यक्रम आंखडून मर्यादित करावा लागला. **गोपाळरावांचे** वडिलबंधु **गोविंदराव** लहानपणीं **सोमेश्वरा**च्या देवळांत **रामकृष्णबोवा माटे** यांचें पुराण श्रवण करून

**व माटे** यांच्या सहवासांत राहून परमार्थाकडे वळले. यांचा अभ्यास संस्कृत चांगलें शिकून इंग्रेजी प्रवेश परीक्षेपर्यंत झाला होता, परिक्षेला ते बसले नव्हते इतकेंच. त्यांनीं जटा व काषायवस्त्रें धारण करून भिक्षावृत्ति अवलंबिली. व हल्लीं ते **पाटण** तालुक्यांतील **गावरडे**गांवीं **रामा**चे मंदिरांत स्नानसंध्या करून पारमार्थिक विचारांत आपला काळ घालवितात. व त्यांच्या जेवणाची सोय गांवकरी करितात. असो. ही गोष्ट येथें सांगण्याचें प्रयोजन इतकेंच कीं अशा प्रकारची स्वैरगति धारण करण्यास मोठा अडथळा संसारांत आपल्यास बद्ध करून घेणें हा होय. कित्येक असेही खप्पी असतात कीं संसारांत शिरूनही त्या स्थितींतील आपलें कर्तव्य न बजावितांच स्वैर वर्तन करूं लागतात. पण विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षण मिळूनही व त्यांत आणखी **मिल्ल**साररूयांचे बहुजन हितवादतत्वाधारें लिहिलेले ग्रंथ पठन करूनही जर कोणी गृहस्थाश्रमाचा कंटाळा करतील तर ते अगदींच माथेफिरू असले पाहिजेत. तात्पर्य आपल्या बंधूस न अनुसरतां **गोपाळरावजी** गृहस्थाश्रम स्वीकारावयास तयार झाले. ह्मणजे त्यांनीं आपला आयुष्यक्रम एकप्रकारें आंखून टाकला.

**कऱ्हाडा**पासून दहा मैलांवर **कृष्णे**चे कांठीं **उंब्रेज** ह्मणून गांव आहे. या गांवीं **गणुअप्पां**चे मामा **विनायकपंत केळकर** यांचें घर आहे. त्या घरांत **रामभट फडके** ह्मणून एक भिक्षुक ब्राह्मण राहात असे. **गणुअप्पा** पुष्कळ वेळां **उंब्रेजास** आपले मामा **केळकर** यांचेकडे जात असत. त्यामुळें **रामभट** व **गणुअप्पा** यांचा चांगला परिचय होता. याच परिचयामुळें **रामभटां**चे चिरंजीव **मोरभट** यांनीं आपली कन्या **अंबुताई** ही **गोपाळरावांस** बायको करा, आह्मांला आपली गरीबी माहीत आहे, आह्मीं मुलाकडे पाहून मुलगी देतों, असें **गणुअप्पाशीं** बोलणें काढिलें. तेव्हां **गोपाळराव** बी. ए. च्या वर्गांत होते; व शिवाय **भागवतांचा** आश्रय आहे हें **मोरभटास** माहीत होतें; तेव्हां मुलीला हें स्थळ वाईट नाहीं असें जाणून त्यांनीं

वरील बोलणें काढलें. **गणुअप्पांनींही** नाहोय म्हटलें नाहीं. लग्न जमलें; व **गोपाळरावजी** गृहस्थाश्रमांत शिरले; व **अंबुताई यशोदाबाई** झाल्या.

एम्. ए. पास झाल्यावर **गोपाळरावजी पुण्यांत** नदीकांठीं **तांबे** यांचे वाड्यांत बिऱ्हाड करून राहूं लागले. आपल्या सुस्वभावी गृहिणीच्या सहवासांतच **गोपाळरावजींचा** बहुतेक काळ गेला. **गोपाळरावजी पुण्याचे** बाहेर फारच थोड्या वेळां गेले असतील; व जेव्हां गेले तेव्हांही थोडाच वेळ राहिले असतील. तात्पर्य अगदीं अपरिहार्य कारण पडल्याशिवाय या दंपत्यास विरहदुःख सोसावें लागलें नाहीं. आतांचा चिरकालिक वियोग मात्र **यशोदाबाईस** अत्यंत जाचीत असेल! हाय! तिचेंचसें काय, आमचें सर्व **महाराष्ट्रवासीयांचेंच** दुर्दैव ओढवलें तें!! असो. **गोपाळरावजींना** बरींच अपत्यें झालीं; त्यांतून आज **माधव, यशवंत** व **सुमती** आपल्या बाललीलांनीं **यशोदाबाईचें** दुःख हलकें करून त्यांना रंजविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

आपला आयुष्यक्रम आंखून ठेवण्यासारखी दुसरी महत्वाची गोष्ट **गोपाळरावजी** कॉलेजमध्यें असतांनाच घडली असें वर म्हटलें आहे. हल्लीं मनुष्याची प्रवेश परीक्षा झाल्यावर आणि बी. ए. ची परीक्षा झाल्यावर त्याला अशी वेळ येते कीं आपली पुढची दिशा आपण ठरवलीच पाहिजे. प्रवेश परीक्षा होतांच जर कोणताही मार्ग निश्चित ठरला तर ठीकच होतें; म्हणजे तो एकतर कोठें पोटापुरती नोकरी पहातो अगर वैद्य, एंजिनियर वगैरे होण्यास पुढें शिकतो. पण जो आपला पुढचा मार्ग ठरविण्याचें लांबणीवर टाकून आर्ट्स कॉलेजांत शिरतो त्याला तीच पंचाईत पुढें बी. ए. झाल्यावर पडते; व यावेळीं कोठेंही नोकरी मिळविण्याचें मनांत आलें, किंवा दुसरा कांहीं धंदा करण्याचें मनांत आलें तर चौरस ज्ञान बरेंच वाढलेलें असल्यामुळें नुसत्या प्रवेश परीक्षा उतरलेल्यापेक्षां यास जास्त सुलभ पडतें व विशेष मानखंडनाही होत नाहीं. असें आहे तरी बी. ए. झाल्यावर आपला योग्य मार्ग शोधून काढून तिकडे जाणें

जास्त दुष्कर होतें. जी विद्या मनुष्याचा मार्ग सुलभ करण्यास उपयोगीं पडावी; तीच तो मार्ग कोणता हें ठरविण्यांत ही अतिशय अडचण आणते. प्रौक्त विचारानें, उदार शिक्षणानें, नानाविध ग्रंथावलोकनानें, नाना देशांच्या इतिहासाच्या ज्ञानानें, अनेकविध शास्त्रांच्या माहितीनें व विशेषत: तत्वज्ञानावरील, अगर अर्थशास्त्रावरील ग्रंथ पाहिल्यानें—मग हे ग्रंथ नुसते पाहिलेलेच कां असतना—तसेंच नाना देशांतील थोर पुरुषांच्या चरित्र वाचनानें बी. ए. होऊन कॉलेजमधून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक तरुणाला हें करूं कीं तें करूं, इकडे जाऊं कीं तिकडे जाऊं असें होतें, तो घाबरतो; व कधीं कधीं 'महाजनो येन गत: स पंथा:' याच्या लौकिकी अर्थानें पुष्कळ लोक—थोर लोक नव्हेत—जो मार्ग स्वीकारतात तोच हे तरुण पंडितही स्वीकारतात. यावेळीं अंगांत विशेष—अलौकिक म्हटलें तरी चालेल—विचार, धैर्य, व ओज आणि स्वाभिमान वाणत असेल तर मात्र आपल्या कर्त्तव्याची दिशा आंखून तो मार्ग स्वीकारण्याचा निश्चय होतो. हा मार्ग जर नवीन असला तर वरील गुणांचा अतिरेक असून शिवाय विशेष प्रकारची कळकळ, उत्साह, महत्वाकांक्षा, एकविषयभ्रान्ति व थोडातरी विक्षिप्तपणा पाहिजे असतो.

आमचे चरित्र नायक बी. ए. होऊन कॉलेजांत गेले असतांना त्यांचें डोकें आपला मार्ग ठरविण्याच्याच कामीं गुंतलें होतें. देशाची विपन्नावस्था पूर्णपणें ध्यानांत आल्यावर ती दूर करण्यास काय उपाय योजावा हा विचार साहाजिकच येतो. आपल्या मनाशीं याचा थोडाबहुत खल झाल्यावर **गोपाळरावजींचा** विचार ठाम झाला कीं देशांत शिक्षणाचा प्रसार जिकडे तिकडे झाल्याशिवाय आपल्या देशाची निकृष्टावस्था दूर होण्याची आशा नाहीं. असे विचार मनांत घोळत असतां ते कोणत्याही विषयावर बोलणें चाललें म्हणजे उच्चारून दाखविल्याशिवाय मनुष्याच्यानें राहवत नाहीं. आणि उच्चारल्यावर त्याला सहानुभूति मिळाल्यावर मनाला आनंद होतो, हुरूप चढतो व सहानुभूति दाखविणाऱ्यांशीं स्नेह

जुळतो. **गोपाळरावजींच्या** मनांत हे विचार घोळत असतां कांहीं इतर गृहस्थांच्या मनांतही तसलेच विचार घोळत होते. याच वेळीं **नामदार बाळ गंगाधर टिळक** हे एल्‌एल्. बी. चा अभ्यास करण्याकरितां **डेक्कन कॉलेजांत** येऊन राहिले होते. रा. रा. **बाळाजी आबाजी भागवत** आणि **के. बी. करंदीकर** हे कॉलेजांत विद्यार्थि होते. एकदां कॉलेजांतील **आगरकरांच्या** खोलींत ही मंडळी बसून बोलणें चाललें असतां निघतां निघतां शिक्षणाचा विषय निघाला; व शिक्षणप्रसाराशिवाय देशाला ऊर्जितदशा यावयाची नाहीं असें सर्वांचें मत पडलें. पुढें या शिक्षणप्रसारासंबंधानें कोणी व कसा प्रयत्न करावयाचा याविषयीं बरीच चर्चा झाली. अशी चर्चा वारंवार होऊं लागली. या चौकडीस या विषयांचें वेडच लागलें ह्मणण्यास हरकत नाहीं. असें होतां होतां आपल्यासारख्या तरुण मंडळीनें स्वार्थत्याग केल्याशिवाय असलीं कामें होत नसतात. तेव्हां इतरांवर अवलंबून राहण्यापेक्षां आपणच या कामास सुरुवात करावी असेंही बोलणें झालें. चौघांचा निश्चय झाला. आपण थोड्या पैशांत निर्वाह करून प्रथम एखादी शाळा व नंतर हळूहळू कॉलेजही काढावें; व लोकांस अल्पायासानें विद्या मिळेल अशी तजवीज करावी. विद्या देणें ती आपणांसारख्या पाश्चिमात्य विद्येंत तरबेज झालेल्यानींच द्यावयाची. यापासून दोन फायदे आहेत; एक युरोपिअन गुरु असले म्हणजे त्यांस पगार फार द्यावा लागतो तर एतद्देशीय पाश्चिमात्य विद्याविभूषित गृहस्थांनीं प्रत्येकीं एकेक विषयाचा स्वतंत्र व पूर्ण रीतीनें अभ्यास करून त्यांत पारंगतता मिळवावी; आणि थोड्या पगारावर संतुष्ट रहावें; ह्मणजे द्रव्याच्या बाबींत फायदा होईल; व दुसरा फायदा ह्मणजे हल्लीं जें येथील विद्यासंपन्न लोकांस पाश्चिमात्य वळण लागत चाललें आहे तें होतां होईतों फिरवितां येईल. ही नवी शिक्षणपद्धति आपल्या लोकांस अशा रीतीनें हितावह होईल व सरकारालाही ती हितावह होईल. कारण अशा एतद्देशीय विद्वा-

नांनीं शाळा, कॉलेजें काढल्यामुळें सरकारावरील खर्चाचा व थोडा जबाबदारीचाही बोजा कमी झालासें होईल; आणि हल्लीं चालू असलेल्या शिक्षणपद्धतींत जर कांहीं दोष असतील तर ते सरकारास स्वानुभवावरून दोष आहेत म्हणून सांगून त्याला स्वानुभवाचे उपायही कळवावे. असा सरकार व प्रजा यांचा फायदा करावा .हा नवी शाळा व कॉलेज वगैरे काढण्याचा हेतु.

आपला इष्ट हेतु तडीस जाण्यास आपल्याजवळ तशा दर्जाचीं माणसें पाहिजेत. म्हणजे तीं माणसें स्वार्थत्यागास तयार असलीं पाहिजेत. मनुष्याची मदत मिळाल्यावरही पैशाची नड आहेच. परंतु मनुष्येंच नसलीं तर कांहींही व्हावयाचें नाहीं. अशीं मनुष्यें कोण? आपण चार असामी तर तयार आहोंत आणखी कोण कोण मिळतील? आपल्या मनांतले हेतु व ह्यांचें प्रत्यक्ष स्वरूप लोकांच्या पूर्ण नजरेस आल्याविना आपणांस जास्त माणसें मिळतील कीं नाहीं याची वानवाच आहे. तर आपण चौघांजणांनींच जो थोडा आपल्या हातून होईल तो प्रयत्न करून दाखविला पाहिजे. आपापल्या परीक्षा झाल्या ह्मणजे आपण अशा कामास सुरुवात करावयाची. हे विचार झाले खरे पण त्यांस तितकें नियत स्वरूप आलें नव्हतें. सर्वांच्याच परीक्षा व्हावयाच्या होत्या. **गोपाळरावजी** एम्. ए., **बळवंतराव** एल्. एल्. बी. व **भागवत** आणि **करंदीकर** बी. ए. व्हावयाचे होते. तेव्हां हे विचार ठसठशीत दिसत नव्हते. पुढें कांहीं दिवसांनीं या महत्वाच्या प्रश्नावर कांहीं विद्वान व थोर गृहस्थांचें मत घ्यावें असें वाटून येथेंच राहणाऱ्या एका विद्वानास **गोपाळराव** व **बळंवतराव** रात्रीचे भेटावयास गेले. भेटीचा परिणाम विशेष कांहीं झाला नाहीं. निदान उत्तेजन कांहीं मिळालें नाहीं. पुण्याचे परम पूज्य नायक विद्वन्मणि त्या वेळीं कोठें बाहेर प्रांतीं होते त्यांजकडे या मंडळीनें आपल्या हेतूंचें सविस्तर वर्णन करून पत्र पाठविलें. त्यावर नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें योग्य अभिनंदन होऊन उचित सल्लाही मिळाली. त्यांत आपण शाळा काढावी, लोकांस प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय

लोकांकडून मदत मिळणें कठीण; आपला थोड्या पगारावर राहाण्याचा हेतु फार स्तुत्य आहे व तो आपण कायम ठेवलात तर लोक मदत करतील; अशा अर्थाचा मजकूर होता. या पत्रानें मंडळीच्या आवेशांत भर पडली असेल असें नाहीं; पण सल्ला अगदीं योग्य व खऱ्या दूरदर्शित्वाची साक्ष देणारी होती. असो.

आमच्या देशांत इंग्रज लोकांचें राज्य झालें त्यापूर्वींच ख्रिस्ती मिशनरी लोकांची येथील लोकांस ओळख झालेली होती. ख्रिस्ती मिशनरींच्याबद्दल पहिल्या पहिल्यानें कितीही अनुकूल मत झालेलें असो; अगर त्यांच्या कार्याबद्दल पाठीमागून कितीही प्रतिकूल मत झालें असो; एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं कांहीं विशेष व्यक्ती पाहिजे तर सोडून दिल्या तरी एकंदरीनें पहातां ख्रिस्ती मिशनरीमंडळ व त्यांतील व्यक्ती म्हणजे आपल्या लोकांपुढें स्वार्थत्याग, अल्पसंतोष, आणि आशासातत्य यांचें मूर्तिमंत उदाहरण आहे. हें येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं कोणतीही गोष्ट करणें झाल्यास आपणांपुढें एखादें मूर्त अथवा काल्पनिक अमूर्त उदाहरण ठेवावें लागतें. त्याप्रमाणें आमच्या या मंडळीनें मिशनरी लोकांचें उदाहरण डोळ्यांपुढें वागवून या कामांत हात घातला. तसें केलें नसतें तर यांच्या हातून या गोष्टी झाल्या नसत्या. किंबहुना, यांच्या नजरेस मिशनरी लोकांचें उदाहरण आलें नसतें तर यांचा यांनांच यांच्या विचाराविषयीं उमज पडला नसता. ही यांची पूर्वींची कल्पना प्रत्यक्ष यांना अगर पुढें ज्यांनीं न्यू इं. स्कुलाची स्थापना करण्यास मदत केली अगर स्थापना झाल्यावर जे या मंडळींत येऊन मिळाले त्यांना कितपत उमजली असेल अगर त्यांच्या मनावर ठसली असेल हें पहाण्याचें हें स्थळ नव्हे. इतकें खरें कीं अगदीं मूळोत्पादकांस पुढच्यांच्यापेक्षां ती जास्त समजली असली पाहिजे.

येणेंप्रमाणे **न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी** आणि **फर्ग्युसन कॉलेज** या अपत्यांचा संभव **गोपाळरावजी**

कॉलेजांत असतांनाच झाला. **गोपाळरावजी** फेलो झाले तेव्हांच त्यांनीं आपल्या मातुःश्रीस पुढील आशयाचें पत्र पाठविलें होतें. "आपल्या मुलाच्या मोठाल्या परिक्षा होत आहेत, आतां त्याला मोठाल्या पगाराची चाकरी मिळेल व आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ आई तूं करीत असशील. पण मी आतांच सांगून टाकतों कीं विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हाव न धरितां मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार." **गोपाळरावजीं**ची आई पुण्यशील, देवभक्त स्त्री होती तरी ज्यावर आपली भिस्त, सर्वप्रकारें सोसलेली गरीबी जाऊन चांगले दिवस ज्याचे योगानें यावयाचे तोच जर कांखा वर करून वडील मुलाप्रमाणेंच विरक्त बनणार असें कळलें तर तिलाही दुःख झाल्यावांचून राहिलें नसेल; व **गोपाळराव**ही तिला दुःख होईल हें जाणत होते. पण त्यांचा हा निर्धार पूर्ण विचारानंतर केलेला होता. जें कृत्य त्यांनीं आरंभिण्याचें मनांत आणलें होतें तें या दुःखापेक्षां कितीतरी श्रेष्ठ आहे अशी त्यांची खात्री झाली होती. सरकारी नोकरी धरून पुष्कळ द्रव्य संचय त्यांनीं केला नसता असें नाहीं. पण अशी आपली विद्वत्ता व कर्तबगारी सरकाराला अगर दुसऱ्या कोणाला पैशाच्या लोभानें विकण्याचें काम त्यांना हीनवाणें, अप्रयोजक, व अहितकर वाटूं लागलें होतें.

**गोपाळरावजी** कॉलेजांत फेलो असतांना त्यांचा आणखी एका गृहस्थाशीं परिचय झाला होता; ते गृहस्थ हल्लींचे **फर्ग्युसन कॉलेज**चे प्रिन्सिपॉल **माधवराव गोळे** हे होत. कॉलेज सोडण्यापूर्वी या दोघांची बरीच मैत्री जमली होती. शिवाय **आगरकर** फेलो असतांना एक गृहस्थ कॉलेजांत विद्यार्थि होते त्यांना जरी त्यावेळीं **आगरकर** फारसे ओळखीत नव्हते तरी असा असा एक विद्यार्थि आहे एवढें त्यांच्या लक्ष्यांत येऊन चुकलें होतें व पुढें कांहीं वर्षांनीं त्यांचा व त्या गृहस्थांचा चांगलाच परिचय झाला.

न्यू इंग्लिश स्कुलाची स्थापना.

वरील चार गृहस्थांनीं ठरविल्यावर मग शाळेसारखी संस्था काढण्यास फक्त यांच्या परीक्षाच मध्यें आड होत्या असें वर सांगितलेंच आहे. पण यांच्या परीक्षा होण्याच्या पूर्वींच यांची व कै० **विष्णुशास्त्री** यांची गांठ पडली. **विष्णुशास्त्री** यांचे वडील **कृष्णशास्त्री** थोडे दिवसांपूर्वीं वारले होते; व **विष्णुशास्त्र्यां**स पुण्यांतच राहाण्याची पाळी आली; शिवाय कांहीं कारणामुळें त्यांस सरकारी नोकरी नकोशी झाली होती. तेव्हां पुण्यांतच राहून खाजगी रीतीनें शिक्षकाचा धंदा करावा असें त्यांचें मनांत होतें; आणि ते त्या वेळीं चालू असलेल्या रा. सा. **वामनराव भावे** यांच्या शाळेंत आयुष्यभर नौकरी पत्करणार होते. ही बातमी **गोपाळराव** व **बळवंतराव** यांस कळतांच यांनीं एकदां **शास्त्रीबुवां**ची गांठ घेतली व आपला उद्देश सांगून आपण सर्वांनीं मिळून एक नवीनच शाळा काढूं असें ह्मटलें. एक दोन भेटींत **शास्त्रीबुवां**चें व यांचें सर्व जुळून सन १८८० च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस **न्यू इंग्लिश स्कूल** स्थापन करावयाचें असें ठरलें. **टिळक** १८७९ अखेर एल्. एल्. बी. झाले. **भागवत** व **करंदीकर** हेही बी. ए. झाले; पण **गोपाळरावजी** एम्. ए. च्या परीक्षेंत नापास झाले. जेव्हां **न्यू इंग्लिश स्कूल** काढावयाचें ठरलें तेव्हांच रा. रा. **भागवत** आणि **करंदीकर** यांणीं आह्मीं या कामीं पडत नाहीं म्हणून सांगितलें. त्यांचा विचार असा पडला कीं या जुटीमध्यें शेवटीं फूट होऊन कलह होतील. त्यापेक्षां आतांच नाहीं ह्मटलेलें बरें. **गोपाळरावजी** पुन्हां अभ्यास करण्याकारितां कॉलेजांतच राहिले; ते म्हणाले एकदां या कामांत गुंतलों ह्मणजे अभ्यास होणार नाहीं व मी एम्. ए. होणार नाहीं; करितां येत्या वर्षीं एम्. ए. होऊन मी येईन. तेव्हां चारांपैकीं तिघे गेले; बाकी राहिलेले **टिळक** यांणीं कै. **शास्त्रीबोवा** व **माधवराव नामजोशी** यांस जोडीदार

घेऊन शाळेची स्थापना तर सन १८८० च्या जानेवारींत केली. **शास्त्रीबुवा** हेड मास्तर झाले; व **टिळक, नामजोशी** यांनीं बाकीची सर्व व्यवस्था लाविली. हे दोनही गृहस्थ शाळेशीं त्यांचा संबंध होता तोंपर्यंत शाळेची भरभराट होण्यास रात्रंदिवस श्रम करीत असत. प्रत्येक संस्थेला दोन अंगें असतात. शाळेचें आंतील अंग म्हणजे शिक्षण वगैरे तें इतर गृहस्थांनींही उत्तम केलें; बाह्यांग म्हणजे द्रव्य साहाय्य मिळविणें वगैरे; हें ह्या दोनही गृहस्थांनीं उत्तम केलें. **शास्त्रीबुवांची** निबंधमाला चालूच होती. पण **नामजोशी** हे पूर्वीं अनेक धंदे सुरू करून ते सोडून देऊन वर्तमानपत्रेंही काढीत असत. त्यांचा छापखानाही होता; पण त्यावर बरेंच कर्जही झालें होतें. शाळेच्या पुष्ट्यर्थ व ज्ञानप्रसारार्थ एक इंग्रजींत व एक मराठींत अशीं दोन पत्रें सुरू करावीं असा खल त्याच वर्षीं सुरू झाला होता; व त्याकरितां **नामजोशांचा** छापखाना कर्ज देऊन घ्यावा असें ठरलें. याच सालीं शाळेला के. **धारप** व **आपटे** येऊन मिळाले. **आपटे** यांनीं मात्र येण्यापूर्वीं **आगरकर** यांचें 'मी खात्रीनें जानेवारींत येतों' असें वचन घेतलें होतें. याप्रमाणें शाळेची चढती कळा होती.

लौकिक चरिताचा आरंभ.

अजूनपर्यंत **गोपाळरावजींचें** जें चरित वर्णन झालें तें व कार्यतें त्यांचें आत्मविशिष्ट चरित. यापुढें त्यांच्या लौकिक चरितास आरंभ होतो. साधारण ज्याचें आयुष्य लोकसेवेंत व लेखवाचनशिक्षणांत गेलें, त्यांचें खाजगी किंवा आत्मविशिष्ट चरित म्हटलें म्हणजे मुळीं असावयाचेंच नाहीं. कारण त्यांना इतर कामें करण्यास वेळच नसतो; शिवाय ज्या **गोपाळरावजींनाज्या** तरुणांनीं कॉलेज सुटल्याबरोबर आपल्या मानेवर जनतेला वळण लावण्याचें जबरदस्त जूं आपण होऊन घेतलें; ज्यांनीं आपला सर्व काळ सार्वजनिक कामाला अर्पण केला होता; ज्यांचें प्रत्येक कृत्य, प्रत्येक वृत्ति व प्रत्येक विचार हीं लोकोपयोगी असावयाचीं; त्यांना लौकिक चरितापेक्षां दुसरें चरित असणें संभवनीयच नाहीं.

आणखी प्रत्यक्ष **गोपाळरावां**च्या चरितांत तर आत्मविशिष्ट चरित त्यांच्या रोगानें व्यापलें होतें. जो थोडा काळ त्यांना खाजगी मिळत असे तो त्यांच्या दम्यानें आपणाकडे लावून घेतला होता, इतकेंच नव्हे, तर पुढें पुढें या जबरदस्त व्याधीनें लौकिक चरितांत अडथळा आणून त्या काळाचेंही हळुहळू भक्षण चालविलें होतें, आणि शेवटीं त्याची पूर्णाहुति घेतली. असो सन १८८० अखेर **गोपाळरावजी** एम्. ए. झाल्यावर आपल्या कृत संकल्पाप्रमाणें स्वापत्यसंगोपनार्थ इतर मंडळीस येऊन मिळाले. शाळेंत शिक्षक झाले; थोड्याच दिवसांत **केसरी**चें संपादकत्व त्यांजकडे आलें. **नामजोशी** यांचा छापखाना घेऊन त्याला **आर्यभूषण** करून त्यात **केसरी** शुद्ध मराठींत व **मराठा** इंग्रजींत अशीं दोन पत्रें सुरू झालीं होतीं; हीं पत्रें शाळेसारख्या अल्पप्राप्तीच्या संस्थेवर तेथें काम करूं लागणाऱ्या मंडळीच्या प्राप्तींत भर पडावी ह्मणून काढलीं होतीं; तरी त्यांत **नामजोशी** व **आपटे** यांचा आग्रह जास्त होता. एकाला आपलें नांव राखण्याकरितां व पैशांकरितां लिहिण्याची खुमखुमी फार होती व दुसऱ्यास स्वप्राप्तींत भर टाकण्याकरितां लिहावें असें वाटे. कसेंही असलें तरी ज्या वेळीं पत्रें काढलीं त्यावेळीं **न्यू इंग्लिश स्कुला**चे सगळे मालक यांनीं त्यांत लिहावें व उत्पन्न शाळेकडे द्यावें असें ठरलें होतें. **आगरकर** व **टिळक** यांस अनुक्रमें **केसरी** व **मराठा** यांचे संपादक ह्मणून पुढें केलें होतें. पण हळुहळू **आगरकरां**नीं **केसरी**चा सर्व भार आपणांवर घेतला. **केसरीं**त इतरांस क्वचित् लिहावें लागे. **मराठ्यां**त मात्र आळीपाळीनें बहुतेक मंडळी लिहीत.

याप्रमाणें **आगरकरां**नीं आपल्या लौकिक चरितास आरंभ केला व आमरणांत तो चरितौघ तसाच अव्याहत राखिला. ह्मणजे पुढील पिढी सुशिक्षित करण्यास शाळेंत शिक्षकाचें काम करावें व चालू पिढी सुश्रुत करण्यास घरीं आल्यावर **केसरी**चे रकानेच्या रकाने भरून काढावे व या दोनही इष्ट हेतूंच्या सिद्ध्यर्थ अवश्य तेंच

ग्रंथावलोकन करावें; याशिवाय इतर खटपटींत ते पडले नाहींत. तिसरें काम सभांमध्यें व्याख्यानें देणें हें होय; पण तें करण्यास त्यांच्या एका जन्माच्या सोबत्यानें पूर्ण आडकाठी आणली होती. ते कधीं कधीं सभेला जात असत पण दम्यानें त्यांस कधींही बोलूं दिलें नाहीं. **गोपाळरावजींनीं केसरी**चें काम अंगावर घेतल्यापासून **केसरी**ची सारखी भरभराट चालली होती.

**केसरी**किशोर **गोपाळरावां**च्या जोपासनेनें अगदीं लहानपणींच अशा सदर्प गर्जना करूं लागला कीं त्यांनीं सर्व श्वापदें भेदरून गेलीं. अति मदोन्मत्त गजराज दिसल्याशिवाय त्याला कधींही आपल्या सटा उभारण्याइतका आवेश येतच नसे. पण जर कोणी 'मदांधेक्षण गजश्रेणी नाथ,' 'करिश्रमानें' स्वनखरांनीं 'गुरुग्रावग्रामा'चा भेद करणाऱ्या या वनराजाला न जाणतां वाटेल तसा वनांत संचार करीत राहिला तर मात्र हा सटा उभारून आपलें पंचानन उघडून खरनखर दंतांनीं त्याचें विदारण करण्यास विपुल पुच्छ दणादण आपटीत उड्या टाकीत जाई. थोड्याच दिवसांत तिकडे **करवीरा**च्या बाजूस असाच एक मदोन्मत्त हस्तींद्र अप्रतिहत निर्भय संचार करूं लागल्याचा वास या **केसरी**किशोरास आला. यानें आपले नखर दंतप्रहार सुरु केले. पण हा हस्तींद्र वन्य नव्हता; तो एका सार्वभौम राजाच्या छत्राखालीं होता हें या शावकाच्या लक्ष्यांत आलें नाहीं. शेवटीं राजसेवकांनीं यास पिंजऱ्यांत अडकविलें.

**कोल्हापूर** प्रकरण काय होतें व त्यांत कोणाचा अपराध होता हें ठरविण्याचें हें स्थळ नव्हे. ज्या गोष्टी धडधडीत कोर्टापुढें आल्या त्यावरून असें दिसतें कीं **केसरी**नें केलेला आरोप जरी खरा असला तरी **केसरी**कारांजवळ सबळ पुरावा नव्हता, आयत्या वेळेस तो सबळ पुरावा कित्येक राजकारणपटूंच्या अडथळ्यानें पुढें आणतां आला नाहीं, एवढें तरी खरें. **केसरी** व त्याचे साह्यकर्ते यांस **बर्वे** यांची माफी मागावी लागली. **बर्वे** यांची माफी मागून जें काम व्हावयाचें होतें तें झालें नाहीं यांत कोणाची कांहीं

चूक झाली, कोणी कोणावर फाजील विश्वास ठेविला असा प्रकार झाला असला पाहिजे. **केसरी** व **मराठा** यांचे संपादक **गोपाळराव** व **बळवंतराव** या दोघांसही **डोंगरी**च्या तुरुंगांत पडावें लागलें. याच्याच आधीं **शास्त्रीबुवांचें** देहावसान झालें होतें. 'छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति' ही म्हण खोटी नव्हे. वय लहान, सार्वजनिक कामास नुकताच आरंभ केलेला, लोकशिक्षणाचें कंकण आपण होऊन हातीं बांधून दीक्षितत्व स्वीकारलेलें, अशा वेळीं कित्येकांच्या कारस्थानामुळें, कित्येकांच्या हलगर्जीनें, कित्येकांच्या आयत्या वेळीं फसवणुकीनें, या सरळ मनाच्या, सद्विचाराच्या, अप्रिय परंतु सत्य व हितकर बोलूनही लोककल्याण करून खरी खरी राजसेवा व देशसेवा करूं इच्छिणाऱ्या बालगोपाळांना जो त्रास झाला व या नरकेसरींच्या धैर्यावर जे आघात झाले त्यांतून ते निभावतात कीं नाहींत याची शंका होती इतक्यांत अनुभवी वडिल बंधुसमान **शास्त्रीबुवांना** चटकन् काळानें ओढून न्यावें व इकडे यांना कारागृहवास भोगणें भाग पडावें यापरती संकटपरंपरा कोणती पाहिजे?

आपण न्यायानें वागत आलों; कोणाला दुखवावें लागलें असलें तरी त्याला केवळ दुखविण्याकरितां आपण लिहिलें नाहीं, त्यांत आपला उदार व स्तुत्य हेतु होता, त्यांत द्वेषबुद्धि मुळींच नव्हती अशी आपली पक्की खात्री असली म्हणजे जरी आपण चुकीच्या समजुतीनें एकादें काम केलें असेंही आपणांस मागाहून कळून आलें तरी नाहक दुसऱ्यास आपण दुखविलें म्हणून आपणांस चटका लागेल, पण त्या वेळच्या आपल्या समजुतीप्रमाणें आपलें वर्तन अन्यायाचें होतें असें आपणांस वाटणार नाहीं; तसेंच आपण कांहींही चुकी न करितां आपल्याशीं अन्यायाचें वर्तन इतरांनीं केलें अशी आपली खात्री असली तरी त्या अन्यायाचा परिणाम निमूटपणें सहन करून आपण राहतों व आपल्या कृत्याबद्दल कांहींच खेद होत नाहीं. पण हा अन्याय सहन करणें उदार तत्वाकरितां योग्य असेल तरच आपण करितों व करावा. जसें **साक्रेतिसानें** जाणूनबुजून

अन्यायाचा निकालही सहन केला; व मनांत खेद न बाळगितां तो सांगितलेल्या शिक्षेप्रमाणें विषप्राशन करून मेला. सरकारानें सांगितलेला न्याय जरी अन्यायाचा वाटत असेल तरी तो कायदा म्हणून मानलाच पाहिजे. न्यायाच्या कोर्टांत अन्याय होत नाहींत असें नाहीं; पण न्याय पुराव्यावरून द्यावयाचा असतो. नेमलेल्या वरिष्ठ न्यायाधिकाऱ्यानें पुरावा पाहून आपला उलट जरी न्याय दिला तरी तो राज्याच्या स्थाइकतेकरितां मानिलाच पाहिजे. याच विचारानें मिळालेली शिक्षा निमूटपणें बाळगोपाळांनीं सोसली; व त्यांस खेद झाला नाहीं. उलट त्यांची लोककल्याणेच्छा पूर्वीपेक्षां प्रबलतर झाली.

जरी आपल्या लौकिक चरिताच्या आरंभींच आपणावर एवढें संकट गुदरलें तरी आपण केलेली लोकसेवा पुष्कळांस मान्य झाली, पुष्कळ लोकांनीं गुणग्राहित्वानें आपलें अभिनंदन केलें व फुल नाहीं फुलाची पांकळी या न्यायानें आपणांस सहाय्य केलें यावरून कोणत्या देशकल्याणेच्छूस लोकसेवा अधिक खुषीनें करण्यास उत्तेजन येणार नाहीं? तुरुंगांत असतांना ‘तरळाचें, रकऱ्याचें, तिखट आमटीचें, कांदाभाकरीचें, लोणीकाप्या वस्तऱ्याचें, तेरा फुट चौरस अंधाऱ्या कोठडींत लघुशंकेनें व दीर्घशंकेनें भरलेल्या पात्राशेजारीं चार जणांनीं सुरवंटांनीं भरलेल्या घोंगडयांत बारा तेरा तास निजण्याचें’ अलौकिक सुख अनुभवूनही करमणुकीकरतां आपल्या आरंभिलेल्या कार्याची मागली हकीकत आठवून आनंद पावणें, पुढें काय करावयाचें, कशा प्रकारें तीं कार्यें तडीस न्यावयाचीं, आपल्यावर आलेल्या प्रसंगांत आपली चूक किती, इतरांची किती, पुन्हां असले प्रसंग न आणण्याची खबरदारी कशी घ्यावयाची, आलेच तरी करावयाचें असें आपलें कर्तव्य कोणतें, या प्रसंगानें आपल्या सहकाऱ्यांस किती त्रास पडला असेल, आरंभिलेल्या कार्याचें किती नुकसान झालें असेल वगैरे वगैरे. प्रस्तुत विषयांवर आणि आपल्या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यामुळें आपलें हिताहित, लोकशिक्षणप्रसारानें देशाची भावी स्थिति, नेटिव्ह

संस्थानांची सुधारणा, देशभाषांचा युनिव्हर्सिटींत शिरकाव इत्यादि इत्यादि अप्रस्तुत विषयांवर चर्चा करणें; अर्थशास्त्रासारख्या शास्त्रांवरील ग्रंथ वाचणें, नाटकांचें भाषांतर करणें, इतर कैद्यांची चौकशी करणें; तुरुंगांतील माहिती करून घेऊन तुरुंगाची स्थिति सुधारण्याचे उपायांचें चिंतन करणें; यासारखीं कामें या धीरवीरानें केलीं. असो.

तुरुंगांतून सुटण्यापूर्वी **वर्डस्वर्थ, मंडलिक,** प्रभृति कित्येक दयाळू गृहस्थांच्या रदबदलीचा कांहींच परिणाम सरकारावर झाला नाहीं; व पुरते शिक्षेचे दिवस भोगिल्यानंतरच या दोघांस मोकळे केलें. पण मोकळे झाल्यावर यांची लोकांनीं जी मिरवणूक काढिली व यांचा जो मानमरातब केला त्यावरून लोकांवर यांनीं किती छाप बसविली होती, लोकांच्या मनांत किती जोराचा आशांकुर यांनीं उत्पन्न केला होता तें उघड दिसतें; व "आमच्या हातून कांहीं लोकसेवा घडल्यानंतर तरी आह्मांस कारागृहवास भोगावा पडता तर कारागृहवासांत लोकांनीं जी आम्हांस मदत केली तीस आम्हीं पात्र ठरलों असतों" अशा आशयाची **आगरकर टिळकांनीं** केलेली इळहळ करण्यास कांहीं कारण नव्हतें हेंही उघड होतें.

सुस्थिति व अभिवृद्धि.

सन १८८१ साल गेलें. ८२ सालापासून **केसरी** पुन्हां भरभराट पावूं लागला. निरनिराळ्या विषयांवर अप्रिय परंतु पथ्य विचार लोकांपुढें मांडण्यानें लोकांचीं मनें जरी असंतुष्ट झालीं तरी तिकडे विशेष लक्ष्य न देतां **केसरीनें** आपलें काम योग्य रीतीनें चालविलें होतें. कधीं सरकाराविरुद्ध, कधीं लोकांविरुद्ध, कधींकधीं थोर माणसांविरुद्ध अशी पत्रकर्त्यांना नेहमीं टीका करावी लागून कोणाचा तरी असंतोष सोसावा लागतो. 'नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता' याप्रमाणें दोनही बाजू संतुष्ट ठेवण्याचें जें कठिण काम तें पत्करून **गोपाळरावजींनीं** आपल्या पत्राचा लौकिक उत्तम केला. तो इतका कीं **केसरीचा** आकार बराच विस्तृत झाला.

या वेळीं **केसरीमध्यें** सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे सर्व विषयांवर लेख येत असत.

इकडे शाळाही वाढत चालली. १८८३ च्या सुमारास तिनें सर्व शाळांस मागें टाकलें. कै. **आपटे** यांच्या परिश्रमानें संस्कृतच्या दोनही स्कॉलरशिपा याच शाळेस मिळाल्या. शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्याही बरीच वाढली. याच वर्षी शाळेची व्यवस्था बरोबर होण्याकरितां कायदेकानू करण्यांत आले. दक्षिण विद्याप्रसारक मंडळी स्थापन झाली. मंत्रिमंडळ व व्यवस्थापक मंडळी नेमली गेली. सर्व आयुष्य या संस्थेकडे खर्च करणारे, काय-मचे व इतर असे शिक्षकांचे भेद करण्यांत आले. आयुष्य वाहि-लेले गृहस्थ मात्र या संस्थांचे मालक व व्यवस्थापक असें ठरलें. या सर्वांबद्दलचे नियम व कायदे उत्तम प्रकारें ठरविण्यांत आले. या संस्थांस पैशांचे पाठबळ पाहिजे; याकरितां पैसे देणारे लोकांचे आश्रयदाते वगैरे निरनिराळे भेद केले. कोणी आश्रयदाते, कोणी द० वि० प्र० मंडळीचे सभासद, कोणी मंत्रिमंडळीचे सभासद वगैरे कोण-त्याना कोणत्यातरी नात्यानें जेथें मराठी भाषा बोलतात तेथले थोर गृहस्थ, कांहीं संस्थानिक व मुंबई इलाख्यांत होऊन गेलेले अगर हल्लीं आहेत असे एतद्देशीयांची अभिवृद्धि इच्छिणारे युरोपि-अन कामगार या सर्वांचा या द० वि० प्र० मंडळीशीं संबंध जुळ-लेला आहे. **सर् जेम्स् फर्ग्युसन्** सारख्या सद्गृहस्थांनींही या संस्थेला मदत केलेली आहे. १८८४ च्या अखेर या शाळेस दुसरें एक भावंड मिळालें; तें **फर्ग्युसन् कॉलेज** होय. शाळा काढल्या-पासूनच केव्हांना केव्हांतरी कॉलेज काढावयाचें असें ठरलें होतें. पण तें इतक्या लवकर निघालें हें खरोखर अत्यंत अभिवृद्धीचें द्योतक आहे. शाळा स्थापन झाल्यापासून कै. **शास्त्रीबुवांचा** मृत्यु व **आगरकर, टिळकांचा** १०१ दिवसांचा कारागृहवास याखेरीज शाळेची हानि होण्यासारखें कांहींच झालें नाहीं. पैशाच्या बाब-तींत मात्र या मंडळीस फारच त्रास पडला असावा. पण एकंदरीनें शाळेची स्थिति दिवसेंदिवस उन्नतच होत गेली याचें आणखी एक

द्योतक, व फार महत्वाचें द्योतक हें आहे कीं सन १८८५ च्या आरंभीं तीन एम्. ए., दोन बी. ए., व एक बी. ए. एल्. एल् बी., आणि एक अंडरग्रॅजुएट असे सात आपलें सर्व आयुष्य वाहिलेले आधारस्तंभ या इमारतीस सांपडले होते.

आपल्याच विचारांचें आपल्यापुढें इतक्या अल्प काळांत प्राप्त झालेलें प्रत्यक्ष स्वरूप पाहून जर कोणा मनुष्यास अभिमान उत्पन्न होणार नाहीं, तर तो मुक्त तरी असला पाहिजे अगर मनुष्यकोटिबाह्य तरी असला पाहिजे. **आगरकर** व **टिळक** यांचा हा आदिविचार कीं उच्चप्रतीचें उदार शिक्षण आपल्याच म्हणजे पाश्चात्य विद्याविभूषित एतद्देशीय गृहस्थांच्या हातीं लोकांस मिळालें पाहिजे. तोच विचार आज प्रत्यक्षतः या अस्तित्वांत दिसला तेव्हां सर्वांपेक्षां यांना विशेष समाधान, विशेष आनंद व विशेष अभिमान वाटला हें उचितच. या वेळेस कॉलेजाला फक्त एक पी. ई. चाच क्लास शिकवण्याची परवानगी मिळाली होती. पण थोड्याच काळांत आपल्याला पूर्ण कॉलेजची परवानगी मिळेल अशी यांस बळकट आशा होती. युनिव्हर्सिटीनें पैशाची अट घातल्याबरोबर निघाली मंडळी याचकवृत्ति करावयाला; युनिव्हर्सिटीनें परीक्षांच्या उत्तम निकालाची अट घातली तर झाले उत्तम निकाल; अशा रीतीनें जी जी नड मध्यें येईल ती ती काढून टाकून आपली अभिवृद्धि करणें हें आपलें कर्त्तव्य आहे असें समजून मंडळी अविरत श्रम करीत होती.

**डेक्कन एज्युकेशन सोसायटी** (दक्षिण विद्याप्रसारक मंडळी) चा उद्देश मध्यम व उच्च प्रतीचें उदार शिक्षण देणाऱ्या अवश्य तितक्या शाळा सर्व दक्षिणभर स्थापणें हा आहे. इतकेंच नव्हे, मूलोत्पादकांच्या मनांत याहीपेक्षां भव्य हेतु होता असें त्यांच्या वारंवार काढलेल्या उद्गारावरून दिसत होतें. **पुणें शहर** सरस्वतीचें माहेरघर व्हावें असा यांचा फार दूरवरचा हेतु होता. शहराबाहेर एके ठिकाणीं प्रत्येक विद्याशाखेचें विद्यापीठ असावें व तेथें कोणत्याही विद्यार्थ्यास वाटेल त्या एक अगर अनेक शाखांचें अध्ययन करण्याचीं सर्व साधनें अनुकूल व्हावीं. हे विचार, अगर या

आशा केव्हां प्रत्यक्षरूप पावतील त्या पावोत; आज मित्तीस तरी त्या हवेंतील बंगल्याप्रमाणें आहेत, हें निःसंशय. अशा आशांस स्वरूप प्राप्त होण्यास अमेरिकेंतल्याप्रमाणें उदार बुद्धीचे, उन्नत विचारांचे, पात्रापात्र तारतम्य, दानपटु, नवकोट नारायण येथें तयार झाले पाहिजेत; इतकेंच नव्हे तर एकाच कामीं सर्व आयुष्य खर्च करणारे, अल्पसंतोषी, परस्परांच्या कार्यांत विघ्नें आणून आपला मोठेपणा वाढविण्याच्या घातुक इच्छांपासून पराङ्मुख असणारे, दृढनिश्चयाचे, दीर्घोद्योगी, अभंग धैर्याचे, दूरदृष्टि, आपल्या वर्तनानें इतरांस वळण लावणारे, अल्प काळांत फलप्राप्ति झाली नाहीं म्हणून निराश न होणारे, सत्याभिमानी, उदार विचारांचे, अज्ञ बहुजनस्तुतिलोलुप नसणारे असे गृहस्थ येथें कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत.

तूं कीं मीं.

असो. येणेंप्रमाण सुस्थिति प्राप्त होऊन सतत अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न चालले आहेत, **गोपाळरावजी** आपल्या सहकाऱ्यांसमवेत शाळा, कॉलेज, व पत्रें, यांची उन्नत स्थिति पाहून समाधान पाऊन पुढच्या धोरणाविषयीं विचार करीत आहेत; इतक्यांत **गोपाळरावजीं**चा आपल्या एका अपत्यापासून वियोग होण्याचा काळ आला; व त्याचप्रमाणें **टिळक** यांनींही आपल्या एका अपत्याला सोडून जावें यापरता मार्ग नाहीं अशी स्थिति येण्याचें आदि चिन्ह दिसूं लागलें. **टिळक** व **आगरकर** यांच्या मैत्रीस आरंभ १८७९ सालीं जेव्हां एक एल्. एल्. बीचा व दुसरे एम्. ए. चा अभ्यास करीत **डेक्कन कॉलेजां**त रहात होते तेव्हां झाला. व तेव्हांही जो स्नेह जुळला त्याचें कारण शोधून पाहिलें तर दोघांचें एका बाबतींत विचारैक्य, मतैक्य हेंच होय. जेव्हां मनुष्य एकाद्या कामीं आवेशांत असतो, नादीं भरलेला असतो तेव्हां त्याला दुसऱ्यापासून नुसती त्या कामीं साहानुभूति मिळाली म्हणजे ती सर्व कामांमध्यें मिळाली, त्याचें व आपलें सर्व बाबतींत मतैक्य आहे, तो व आपण सर्वस्वी एक आहोंत व तसेच आमरण राहूं असें वाटतें; कधीं कदाचित् थोडासा मतभेद अगर निराळा स्वभाव विशेष दिसलाच तर तो आपल्या कार्यास

साधक होणार नाहीं, तशी स्थिति असतांही आपण आमरण सहयोगित्वानें कोणतें कार्य करूं असें वाटतें; किंवा आपला उद्दिष्ट मुख्य हेतु जर एक आहे तर इतर बाबतींत दुर्लक्ष्य करून इष्ट कार्य साधूं असाही कधीं कधीं भरंवसा येतो. पण या सर्व चुका आहेत. जो भेद किंवा विशेष दिसतो तो केवढा आहे, त्याचा व्याप केवढा होईल, आपल्या कार्याचा व्याप केवढा आहे व पुढें केवढा होईल व या दोनही व्यापांची सांगड पडली म्हणजे त्यांमध्यें सलोखा राहील कीं विरोध येईल इतका पोंच मनुष्यामध्यें आरंभीं नसतो. याबद्दल कोणाला दोष देणें योग्य नाहीं. कारण आवेशाशिवाय कार्य होत नाहीं, व आवेशांत असें इतर बाबतींत दुर्लक्ष्य व्हावयाचेंच; किंबहुना इतका पोंच त्या वेळीं असणें हेंच अहितकारक म्हणतां येईल. याला पुरावा इतकाच कीं मागें सांगितल्याप्रमाणें रा. रा. **भागवत व करंदीकर** यांना स्पष्ट किंवा अस्पष्ट रीतीनें हें भांडण्याचें भय दिसलें म्हणून त्यांच्या हातून कांहीं झालें नाहीं; पण या बाळगोपाळांच्या त्या वेळच्या अंधत्वानें इतकें तरी कार्य झालें.

आमच्या देशांत विद्वान् गणिले जाणाऱ्या लोकांमध्यें दोन पक्ष आहेत; एक राजकीय प्रधान व दुसरा सामाजिक प्रधान. पहिल्याचें म्हणणें राजकीय सुधारणा झाली, राजकीय सत्ता आपल्या हातीं आली म्हणजे झालें; व त्याकरितां इतर गोष्टींकडे दुर्लक्ष्य झालें तरी चालेल; किंबहुना इतर गोष्टींत आपली स्थिती जशीच्या तशीच राहिली अथवा अधिक अवनत झाली तरीही हरकत नाहीं असें त्या पक्षास वाटतेंसें दिसतें. दुसऱ्या पक्षाचा असा ठाम विचार झाला आहे कीं राजकीय सुधारणा झाली, इतर पक्षाच्या मतीं आपल्या हातांत राजसत्ता आली—म्हणजे आपलें कार्य झालें असें नव्हे; तर एकंदर जगांतील राष्ट्रांसह जीवनार्थ कलहांत आपला टिकाव लागावयास पाहिजे असेल तर आपल्या कर्त्तव्याची व्याप्ति विस्तृत केली पाहिजे; राजकीयेतर म्हणजे सामाजिक व धार्मिक मतांची उन्नति झाली पाहिजे; व सामाजिक व धार्मिक बाबतींत सामान्य जनांचीही त्या मतानुसार वागणूक झाली पाहिजे. आमचे

चरित्रनायक **गोपाळरावजी** हे दुसऱ्या पक्षांतील होते. हें त्यांच्या लेखावरून उघडच होत आहे. त्यांची व ज्यांची पहिल्यापासून या देशसेवेच्या कामीं सांगड जडली ते गृहस्थ पहिल्या पक्षांतील आहेत म्हणून या उभयतांमध्यें विरोध पडत चालला. या विरोधाचें मूळ **शास्त्रीबोवा** जिवंत असतांच थोडें थोडें दिसूं लागलें होतें. पण त्याचा एवढा प्रचंड वृक्ष होईल असें त्यांच्या जवळ असणाऱ्या इतर गृहस्थांस वाटलें नव्हतें, इतकेंच नव्हे, त्यांचें त्यांसही वाटलें नव्हतें. एकादें आर्टिकल् **केसरींत** घालण्यास **शास्त्रीबोवांनीं** लिहिलें व तें **गोपाळरावजींच्या** मनाविरुद्ध असलें ह्मणजे तें शुद्ध केल्याशिवाय—अर्थात् त्याचा झोंक आपल्या मताप्रमाणें करण्यास **गोपाळरावजी** चुकले नाहींत. हें पाहून त्यांचे मित्रांस बरें वाटत नसे. पण हा विरोध, हा मतभेद वर म्हटल्याप्रमाणें मुळीं त्या वेळीं, किंवा त्याच्या आधीं व नंतर कांहीं काळपर्यंत दिसलाच नसावा अगर दिसला असला तरी तो इतका विघातक होईल असें त्या वेळीं वाटलें नसावें. ह्मणतात तें खोटें नाहीं कीं अहोरात्र जवळ राहिल्यानें मनुष्यांचा जो परिचय होतो तो कित्येक बाबतींत जसा फायदेशीर असतो तसा दुसऱ्या कित्येक बाबतींत बेफायदेशीरही होतो. घरीं बाहेर एका ठिकाणीं वागल्यामुळें **टिळक, आगरकर** यांना नाना विषयांवर वादविवाद करण्याचें कारण पडत असे, प्रसंग येत असे; शिवाय तुरुंगांतील एकशें एक दिवसांत त्यांचे किती विषयांवर वादविवाद झाले असतील याचा अंत नाहीं. त्या योगानें पदोपदीं तो विरोध वाढत चालला. जर हे दोघे अगर एकही सौम्य प्रकृतीचे गृहस्थ असते, यांच्या अंगीं जातीचेंच तेज तितकें नसतें तर हा उद्वेगकारक प्रकार झाला नसता. पण जेथें मत म्हणून देण्याचा प्रसंग आला तेथें कोणाचीही भीड मुरवत न धरितां आपलें मत द्यावयाचें, इतकेंच नव्हे, पण आपलें मत चुकीचें आहे अशी खात्री झाल्याशिवाय तें फिरवावयाचें नाहीं असा या उभयतांचा गुणच. कोणताही महत्वाचा अगर कसाही प्रश्न असो

त्यावर जें आपल्याला वाटेल तें मत द्यावयाचें; त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करावयाचें नाहीं असा यांचा स्वभाव असल्यामुळें यांच्या मतांतील विरोध अधिक स्पष्टपणें दिसूं लागला व साधारण बाबतींतही त्यांची छाया पडूं लागली. **आगरकरांचे** सहयोगी **टिळकां**खेरीज आणखी नव्हते असें नाहीं. पण त्या इतरांचा व **आगरकरांचा** पहिल्यापासून उत्पादक या नात्यानें कांहीं तसा संबंध नव्हता. आपण सारख्याच दर्जाचे, सारख्याच महत्वाचे असा अभिमान कधीं वाटला तर तो उघड कोणीही बोलून दाखविला नसला तरी मनांतल्या मनांत या दोघांसच वाटणें साहजिक व योग्य होतें. त्यामुळें मतभेद झाला तर तो समजूत करून घेऊन काढून टाकणें दोघांच्याही हातून झालें नाहीं. असा मतभेद वाढत जातां जातां प्रत्येक क्षुल्लक बाबतींत झालेली बोलाचाली व त्यायोगें आलेला परस्परसंबंधीं तिरस्कार यांचीही त्यांतच भर पडली.

शेवटीं **केसरींत** लेख कसे यावे व कसे येऊं नयेत याविषयीं तंटा पडला; बहुजन समाजास गुदगुल्या करणारे लेख लिहून त्यांच्याकडून पाठ थोपटून घ्यावी किंवा चारच कां होतना—पण विद्वान्–गृहस्थांकडून आपलीं मतें निर्भीडपणें प्रतिपादन करवून बहुजन समाजाला त्याचा रोष आला तरी खरें उत्तम वळण लावि-ल्याबद्दल शाबासकी मिळवावी हा प्रश्न उद्भवला. व **आगरकरांनीं** दुसरा मार्ग स्वीकारला. त्यांच्या सहयोगी गृहस्थांपैकीं पुष्कळ त्यांच्या बाजूचे होते. कारण त्यांच्या मार्गामुळें आरंभिलेल्या कार्यास पर्यायानें मदत होण्याची आशा होती. आरंभिलेल्या कार्याचें कांहीं कां होईना, त्यांत किती कां अडचणी येतना, आपल्या मताला बहुजनमताप्रमाणें वळण लावावयास कां पडेना, बहुजन-स्तुतिलोलुपत्व सोडावयाचें नाहीं असाच ज्यांचा विचार-किंबहुना ज्यांच्या विचारांचें पर्यवसान बहजन समाजधुरिणत्व साधण्यांतच होतें त्यांस **आगरकर** यांचे विचार पसंत पडले नाहींत यांत नवल नाहीं. **गोपाळरावजींस केसरींत** लिहिण्याचा कंटाळा आला. 'रावणाय स्वस्ति, रामाय स्वस्ति' असे ज्यांचे विचार त्या गृहस्थांस

**केसरीमराठ्यापासून** शाळेस फायदा नाहीं, उलट तोटा आहे, असें स्पष्टपणें दिसल्याबरोबर व ही संधि प्राप्त झाल्याबरोबर पत्रांचा दक्षिण विद्याप्रसारक मंडळीशीं कांहीं संबंध नाहीं असें जगजाहीर करणें इष्टच वाटलें. **आगरकर** व **टिळक** यांनांही तें पाहिजे होतें. एक्रास तसें वाटण्याचें कारण उदार शिक्षण देण्यास उद्युक्त झालेल्या मंडळीचे असले विचार असा आरोप त्या मंडळीवर येऊं नये ह्मणून व दुसऱ्यास आपणांशिवाय इतर सर्वांच्या मतीं दक्षिण विद्याप्रसारक मंडळीच्या कार्यांत अडथळा येईल अशी जी भीति वाटते ती, न जाणो, खरी झाली तर आपल्या डोकीवर त्याचें खापर फुटूं नये अशी इच्छा होती ह्मणून. पुढें थोड्याच दिवसांत

सुधारक पत्राचा जन्म.

**आगरकर** यांनीं स्वमताचें प्रकाशन करण्यास **सुधारक** नांवाचें नवीनच पत्र सुरू केलें. 'ज्या तत्वांचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, तीं तत्वें हा सुधारक महाराष्ट्र लोकांपुढें वारंवार आणील. असें करण्यांत त्यास, आज ज्याचा जारीनें अंमल चालू आहे त्या लोकमताविरुद्ध बरेंच जावें लागणार असल्यामुळें, फार त्रास पडणार आहे. पण त्याची मी पर्वा करीत नाहीं; कारण ज्या लोकमताचा पुष्कळांस बाऊ वाटतो, त्याचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं बऱ्याच बाबतींत त्याचा आदर करण्यापेक्षां अनादर करणें हाच श्लाघ्यतर मार्ग होय.' असें त्यांनीं '**सुधारक** काढण्याचा हेतु' या निबंधांत म्हटलें आहे. सारांश बहुजन समाजाच्या रोषाची पर्वा न करितां खऱ्या सुधारणेचा फैलाव करणें हेंच सुधारकाचें कर्तव्य असें ठरवून त्यांनीं तें पत्र सुरू केलें. '**सुधारक**' हें नांव लोकांस किती अप्रिय झालें होतें व आहे हें पाहिलें म्हणजे '**सुधारक**' नांव घेण्यापासूनच **गोपाळरावजींच्या** सहिष्णुतेची कल्पना करतां येते. लोकांनीं ज्या नांवाचा छल मांडिला आहे तेंच नांव धारण करण्यास न भिणें अर्थात् होणारा छल सोसण्यास तयार असणें ह्मणजेच धैर्य व सहिष्णुता होय. **केसरीचा** असा वियोग झाला

तरी **आगरकर** यांनीं स्वमताच्या अभिमानानें हें **'सुधारक'** पत्र सुरू केलें व अनेक अडचणी सोसून तें तहाहयात चालविलें; आणि अनेक विषयांवर नव्या तरुण पिढीचे तरी विचार सुमार्गी लाविले. आपलीं मतें, आपण घेतलेली दिशा किती योग्य आहे हें त्यांनीं एके ठिकाणीं व्यक्त केलें आहे: "सर्वतो मुखीं निंदा होत असलेल्या सुधारणेचा व सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बळ नाहीं इतकेंच नाहीं, तर त्याचेंच सर्वत्र साम्राज्य होणार असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं" **'सुधारक'** जन्मास आला आहे.

येणेंप्रमाणें **टिळक** व **आगरकर** यांच्या परस्पर मतभेदामुळें **केसरी** पत्र जाऊन त्या ठिकाणीं **आगरकरांच्या** हातीं **सुधारक** पत्र आलें. इकडे **टिळकांस**ही द० वि० प्र० मंडळीच्या तहाहयात सभासदांमधून आपलें नांव काढून घ्यावें लागलें. या दुसऱ्या गोष्टीचा जरी हा मतभेद अंशतः कारण झाला असेल तरी इतर कारणांचीही त्यांत भर पडली आहे; येथें **टिळकांचें** चरित्र लिहिण्याचा प्रसंग नसल्यामुळें त्या कारणांचें पृथक्करण करण्याची येथें आवश्यकता दिसत नाहीं. तरी येथें एवढें सांगून ठेविलें पाहिजे कीं त्या कारणांचें या उभयतांमधील मतभेद भराभर रुंदावण्यास सहाय्य झालें. **केसरी** व **सुधारक** हीं दोन एकमेकां विरुद्ध-पक्षांचीं ह्मणजे मतांचीं प्रकाशक साधनें आहेत. हे दोन विरुद्ध सैन्यांचे बावटे आहेत असें लोकांच्या स्पष्टपणें नजरेस येण्यास संमतिवयाचा कायदा ही सुसंधि आली. या वादांत व त्यापुढें अजूनपर्यंत **केसरी** व त्याचा पाठीराखा **मराठा** हे आणि **सुधारक** हीं दोन टोकें आहेत. या दोन टोकांचा संयोग कधीं झाला नाहीं व झाला असें दिसलें असलें तर तो भासमात्र होय; व पुढें हा संयोग केव्हां होईल तो होवो.

या दुफळीपासून समाजाचें अहित काय झालें असा प्रश्न उत्पन्न होतो. याचें उत्तर थोडक्यांत देणें म्हटलें म्हणजे, अहित तर नाहींच पण उलटें हितच झालें आहे. पहिल्यानें ही गोष्ट ध्यानांत ठेविली

कीं दोन पक्षांचीं हीं पत्रें मुखें आहेत म्हणजे पुष्कळ काम आटोपलें. एकपक्ष खरा अगर दुसरा पक्ष खरा; व बहुजनसमाजाला केवळ कुरवाळून, सत्य पक्ष सोडण्याची पाळी आली असतां तोही सोडून देऊन, आपलीं खरीं मतें झांकून–किंबहुना आपलें घरांतील वर्तन लोक पहात नाहींत व पत्रांतील मतांवरूनच माझी परीक्षा करितात आणि फसतात; त्याला मीं काय करूं? मीं कांहीं त्यांला फसवीत नाहीं अशी आपल्या मनाची समजूत करून कोणत्याही वर्तमानपत्र संपादकानें आपला धंदा चालविला तर तें योग्य–अगर इष्ट असेल तें बोलेन व साध्य असेल तें करीन अशा रीतीनें तो धंदा चालविला तर तें योग्य; ही निवड आपोआपच होईल. जर हे दोन पक्ष इतक्या स्पष्ट तऱ्हेनें लोकांपुढें आले नसते तर आज जी चळवळ–देशांत दिसते ती दिसली नसती. एकाचें महत्व वाढण्यास दुसऱ्या विरोधी पदार्थाची प्रत्यक्षता पाहिजे असते. सावलीची किंमत उन्हाच्या योगानें चांगली कळते; चित्रांत रंग वठविण्याकरितां व चित्रित पदार्थाचें आकारमान कळण्याकरितां कांहीं साधारण पदार्थांची योजना केलेली असते; व साधूचें महत्व कळण्याकरितांच 'निंदकाचें घर असावें शेजारीं' अशी साधूक्ति आहे. तसें एक पक्ष बरोबर लक्ष्यांत येण्याकरितां दुसऱ्या पक्षाचें अवलोकन झालेंच पाहिजे. या न्यायानें पाहिलें असतां हे दोनही पक्ष लोकांपुढें स्पष्टपणें आल्यामुळें फायदाच आहे तोटा नाहीं असें वर जें म्हटलें आहे तें उघड होईल. मात्र दिलागिरीची गोष्ट इतकीच आहे कीं सुधारकेतरपक्ष लोकांपुढें जसा खराखरा आहे तसा येत नाहीं मग त्यांची बाजू त्यांना कळली नाहीं, कीं कळून सवरून ती लंगडी असल्यामुळें लोकांपुढें तशी मांडणें त्यांस आवडत नाहीं. काय असेल तें असो.

**सुधारक** स्थिरस्थावर. निघाला. जिकडे तिकडे त्याचा फैलाव झाला. इतर पक्षाची अटकळ खोटी ठरली. त्यांनीं आणलेले अडथळे सर्व दूर झाले. असलें वर्तमानपत्र चालविण्यास आपणांस अत्यायास पडतील, आम्हीं तुम्हांला त्राहि त्राहि करून सोडूं अशी घातलेली धास्ती सर्व लयास गेली.

**सुधारका**मध्यें नानासामाजिक विषयांवर अर्थगंभीर, सयुक्तिक परिणामीं हितकर, सद्यःस्थिति उघड करणारे असे सणसणीत लेख येऊं लागले. साधारण सामाजिक विषय बहुतेक खलास झाले. **सुधारकांत** सामाजिक विषयांवरच लेख येत असत असें नाहीं; राजकीय विषयांवरही येत असत; परंतु **सुधारकाचें** मुख्य धोरण सामाजिक विषयांकडे असे. सामाजिक या शब्दाचा व्यापक अर्थ घेतला तर औद्योगिक, राजकीय, धार्मिक हे सुद्धां सामाजिकाचे पोट भेदच आहेत. अशा दृष्टीनें पाहिलें असतां धार्मिक तत्वांस कसें वळण पाहिजे, औद्योगिकदृष्ट्या समाजाचा फायदा कशानें होईल, राजा व प्रजा यांमधील संबंध कसा असावा वगैरे विषय **सुधारकाच्या** आंखलेल्या मर्यादेच्या आंतीलच होत व अशा विषयांवर कधीं कधीं **सुधारका**मध्यें लेख आलेच आहेत. शिवाय वर्तमानपत्र चालविणाऱ्यास काळस्थळानुरोधानें कांहीं वादविवादांत यदृच्छेनें व अनिच्छेनेंही पडावें लागतें, त्याप्रमाणें तसलेही स्फूट लेख **सुधारकांत** वारंवार प्रसिद्ध झाले आहेत. **सुधारक** निघाल्या दिवसापासून प्रो. **गोखले** हे त्यांचे सहसंपादक बरेच दिवस होते. परंतु त्यांस इतर कामामुळें हें काम सोडून देणें भाग पडलें. त्यांच्या नंतर रा. रा. **देवधर,** हल्लींचे एक संपादक, यांनीं आपखुषीनें **गोपाळरावजींस** सहाय्य करण्याचें कबूल केलें. हे **देवधर** कॉलेजांत असतांनाच **गोपाळरावजींस** माहित झाले होते असें वर सांगितलेंच आहे. **देवधर** यांनीं अजूनपर्यंत आपलें कर्त्तव्य उत्तम तऱ्हेनें बजाविलें आहे. **देवधर** यांची व **आगरकरांची** कॉलेजांत जी थोडी ओळख झाली होती ती दृढतर होण्यास **देवधर** यांचे कांहीं लेखच कारण झाले. अशा रीतीनें **सुधारक** निघाल्यापासून तों **गोपाळराव**जी हयात होते तोंपर्यंत–अजून पर्यंतही–एक सारखी त्याची अव्याहत प्रगति चालली आहे; व लोकांस सत्यज्ञानामृताचे घोंट त्यांच्या इच्छेविरुद्धही पाजण्याचें काम तो करीत आला आहे.

इतक्या काळांत कॉलेजचीही सुस्थिति झाली. एकामागून

एक कॉलेजला वरचे वरचे वर्ग मिळून कॉलेजचें नांव जिकडे तिकडे गाजलें. **टिळक** तहाहयात संसदांतून निघून गेले त्याच वेळाच्या सुमारास आणखी दोन असामी गेले. परंतु त्यानें कॉलेजचा अगर शाळेचा तोटा झाला नाहीं. त्यांचीं कामें करण्यासारखे गृहस्थ नवीन मिळाले. पण पुढें जे दोन तीन मृत्यु घडले त्यांपैकीं दोहोंनीं झालेली नुकसानी भरून येण्यास अवधिच पाहिजे. प्रस्तुत ती नुकसानी भरून येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. असो. इतकें नुकसान झालें तरी द० वि० प्र० मंडळींत आणखी नव्या तहाहयात संसदांची भर पडतच गेली व आरंभलेलीं सर्व कार्यें निर्विघ्नपणें तडीस जाऊं लागलीं इतकेंच नव्हे, तर त्यांची भरभराट झाली. कै. वा. **आपटे** यांचेमागें आपण जीवंत राहूं अशी मुळीं खात्री नसतांहीं **गोपाळरावजी** कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. **गोपाळरावजी** शिक्षक होते, प्रोफेसर होते व प्रिन्सिपॉलही झाले, व जीं कामें त्यांनीं आरंभिलीं त्यांत त्यांनीं आपल्या थोड्याशा आयुष्यांत पहिली जागा पटकावली. मनुष्य कोणत्याही धंद्यांत कां पडेना तो काळस्थळानुरूप आपल्या मगदुराप्रमाणें वर चढतोच चढतो.

अंत.

कॉलेजांत असतांना जो रोग **गोपाळरावजींस** जडला व ज्यानें त्यांचेवर इतका आपला पगडा बसवून अंमल चालविला तो मागें सांगितल्याप्रमाणें आनुवंशिकच होता. **गोपाळरावजींचे** वडिल, मातुःश्री, व आजोळची आजी यांस दमा होताच; व तो **गोपाळराव** आणि त्यांचे वडील व कनिष्ठ बंधु या सर्वांस जडला. वडिल बंधु **गोविंदराव** यांस दमा आहे तरी ते अजूनही बरेच खणखणीत आहेत. कोणाचें असें मत आहे कीं **गोपाळरावांनीं** आपल्या रोगांतून साफ सुटण्याच्या इच्छेनें जीं सदांसर्वदां नानाविध औषधें घेतलीं त्यांनींच त्यांचा दमा जास्त झाला. पण या म्हणण्यांत थोडेंसें तथ्य असलें तरी आधींच असला शरीर झिजविणारा रोग; त्यांत लहानपणापासून गरिबी व हाल, आणि चांगला विचाराचा काळ

आल्या दिवसापासून आपल्या स्वतःची, कुटुंबाची, आपल्या आरंभिलेल्या कार्याची व विशेषतः देशाची काळजी रात्रंदिवस वाहून त्या सर्वांच्या कल्याणार्थ अविरत श्रम—शारिरिक व मानसिक श्रम; व शिवाय आरंभिलेल्या कार्यास—अफाट समुद्रांत ढकललेल्या नौकेस—मिळालेले धक्के, कर्णधाराचा मृत्यु, चांच्याची कैद, नावाड्या नावाड्यांत तंटा, इतर उतारू लोकांनीं अज्ञानामुळें केलेला छळ, साहाय्यास आलेल्या नावाडी मंडळीचा लय वगैरे नाना संकटें; इतक्या गोष्टी काळास साह्य असतांही त्याच्याशीं चाळीस वर्षें टक्कर मारणारा गडी किती सुदृढ, किती धैर्यवान्, किती निष्कलंक नीतीचा व किती मितव्यवहारी असला पाहिजे हें वाचकांनींच लक्ष्यांत आणावें; व वरील म्हणणें सयुक्तिक आहे कीं काय तें पहावें. पण हा विवाद करण्याचें विशेष प्रयोजन काय? आम्हीं कितीही विवाद करीत बसलों तरी झाली ती गोष्ट झालीच. शेवटल्या शेवटल्या चार पांच वर्षांत दम्यानें अति उचल खाल्ली. **गोपाळरावजींस** त्यानें त्राहि त्राहि करून सोडिलें. **गोपाळरावजींनीं** एकदम कॉलेजांत येण्याकारितां जो पुण्यांत पाय ठेविला तो पुनः बऱ्याच मुदतीची पुण्याची रजा घेण्याकारितां त्यांनीं काढला नाहीं. सुटींत कोठें मामांकडे **वऱ्हाडांत** अगर **कऱ्हाडास** जाण्याकारितां अगर **मुंबई** किंवा **पुण्या**जवळील **केडगांव** अशा ठिकाणीं अगर कांहीं विशेष कारणानें त्यांनीं कांहीं दिवस **पुणें** सोडलें असेल. पण अगदीं शेवटीं आपला नाइलाज झाला असें पाहून अर्धवट नाखुषीनें मित्रांच्या आग्रहास्तव चांगल्या कोरड्या हवेच्या ठिकाणीं जावें असें त्यांच्या मनांत येऊं लागलें होतें; परंतु हा जो पसारा पसरून ठेविला आहे त्याची वाट काय? हीं कामें कोणी करावीं? असा विचार मनांत येऊन त्यांचा निश्चय ठरेना. यांत कोणी त्यांस दोष लावील तर तो योग्य होणार नाहीं. ज्यांचा पूर्वीपासून असा पाश लागलेला तीं कामें सोडून जाणें म्हणजे केवळ जिवावर येतें. कोणी ह्मणेल कीं त्यांनीं येथें राहून जी मदत केली—अर्थात् केली नाहींच ह्मणण्यास हरकत नाहीं—ती न करतां त्यांनीं आपल्या शरी-

राची काळजी घेतली असती व हा व्याप सोडून दूर निरोगी कोरड्या हवेंत जाऊन ते राहिले असते तर त्यांनीं कांहीं दिवस तरी जास्त सुख भोगिलें असतें व स्वकुटुंबियांस आणि मित्रांस आनंद दिला असता. पण वसुधैव कुटुंबकं अशी ज्यांची स्थिति–निदान, ‘ कुळार्थ पुरुष, ग्रामार्थ कुळहि समस्त सोडावें, ग्रामहि देशार्थ मही आत्मार्थ ’ अशांतले ज्यांचे विचार–ते स्वसुख निरभिलाष असल्या-मुळें शेवटचे दोन दिवसही आपण दूर जाऊं नये असा त्यांस त्यांच्या अंतरात्म्याचा बोध होत असावा.

गेल्या म्हणजे ९५ सालच्या उन्हाळ्यांत **गोपाळरावजींची** प्रकृति अति बिघडली. होतां होतां इकडे कै. **केळकर** यांचें दुखणें जबरदस्त होऊन त्यांस काळानें ओढून नेलें. ही वार्ता ऐकून **गोपाळरावजींनीं** ‘ आह्मांस असेच खिचपत ठेऊन इतर मंडळी-वरच काळ कां उड्या टाकतो ! ’ असे उद्गार काढले. **केळ-करांचा** मृत्युलेख हाच **आगरकरांचा सुधारकांतील** शेवटला लेख. याच्या पूर्वीच त्यांस लेख लिहिणें म्हणजे जिवावरचें झालें होतें. पण त्यांनीं ‘ टांकांतून अर्थबोधक अक्षरें येत होतीं तो-पर्यंत ’ लेख लिहिण्याचें सोडलें नाहीं. परंतु रोगानें काळाचें पाऊल त्यांच्या अंतरात्म्यापर्यंत नेऊन ठेविलें. दोन चार दिवसां अलि-कडे साधारण प्रवासाचा त्रास सोसण्याची शक्ति आल्याबरोबर आपण **मिरजेस** कोरड्या हवेंत जावें असा त्यांचा नक्की बेत ठरून त्याप्रमाणें तयारीही चालली होती. पण आपण करीत असतों एक व होतें भलतेंच !! सर्व बेत फसले ! आणि त्या अधम, मांग-हृदयी काळानें **गोपाळरावजींच्या** आत्म्यावर पाश टाकलाच !! आह्मांस–**महाराष्ट्रीयांस** दुःखसागरांत लोटून देण्याकरितां त्या दुष्ट काळानें ही कसायाची करणी केली ! रविवारीं रात्रीं **गोपाळ-रावजी** चांगले शुद्धीवर असून समाचारास आलेल्या मित्रमंडळी-बरोबर बोलले. पहांटे पहांटे शौचास आपण होऊन उठून जाऊन परत आले; घरांतील मंडळीस त्यांनीं सांगितलें कीं आतां मला जरा बरें वाटतें आहे; मी निजतों व तुह्मींही निजा. असें ह्मणून

**गोपाळरावजी** जे झोंपीं गेले ते पुन्हां जागे झालेच नाहींत! काळझोंपच त्यांस लागली!!! तिकडे **सुधारक** लोकांस आनंद देण्याकरितां लोकांच्या घरोघर जाऊन भेटी घेऊं लागला तों इकडे ही भयंकर वार्ता सर्व नगर दुःखमय करून टाकण्याकरितांच कीं काय मोठ्या आवेशानें धांवत सुटली! जिकडे तिकडे कल्होळ माजला!! लोकांच्या झुंडीच्या झुंडी चतरशिंगीकडे व **स्मशानभूमीकडे** जाऊं लागल्या. सर्वांच्या डोळ्यांतून आंसवें गाळणाऱ्या मृत्यूला त्याची कांहींच लाज वाटली नाहीं!! सर्व भक्षका अंतका, तुला अकल म्हणून नाहींच ना! आपण आपल्या पोटाची खळी भरण्याकरितां कितीकांचे आनंददीप विझवितों, कितीकांचे आधारस्तंभ ढांसळून पाहितों याची कधीं तूं गणना केली आहेस काय? पण तुला तरी बोल लावून काय करावयाचें आहे? जशीं मनुष्याचीं कर्तव्यें मनुष्यानें केलींच पाहिजेत तसें काळा, तुझें कर्तव्य तूं केलेंच पाहिजे. तुझ्या कर्तव्यदक्षतेचा आम्हीं कित्ताच घेतला पाहिजे.

ता. १७ जून १८९५ रोजीं **गोपाळरावजींनीं** देह ठेविला.

गुण.

**गोपाळरावजींची** मूर्ति आतां आह्मांपुढें नाहीं; पण कीर्ति आहे. मूर्त्त वस्तूंना काळाची भीति आहे पण अमूर्तांवर त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं. **गोपाळराव** यशोरूप आम्हांपुढें आहेतच; आणि थोर महात्म्यांचीं चरित्रें वाचल्यापासून आपणांस जो लाभ होतो तो यामुळेंच. **गोपाळरावजी** जरी आपल्या कुटुंबियांस, आपल्या इष्टमित्रांस, सहयोग्यांस, आपल्या विद्यार्थ्यांस, **महाराष्ट्रीयांस** व शेवटीं मातृभूमीस दुःखांत सोडून निघून गेले तरी त्यांनीं केलेलीं कामें, लिहिलेले लेख, व आपल्या वर्तनानें घालून दिलेलें उदाहरण हीं आपणांस मार्गदर्शक आहेत त्यांचा फायदा आम्हीं करून घेतला पाहिजे.

**गोपाळरावजींच्या** आंगीं भक्तिपरायणता हा सर्वांत मोठा गुण होता. जे आपणांस वडिल, ज्यांच्यापासून आपण कांहीं शिकलों त्यांच्या ठायीं आपली पूज्यबुद्धि असणें हीच भक्तिपरायणता. हा गुण **गोपाळरावजींनीं** मातापितरांपासून संपादिला

असें जेथें म्हटलें आहे, तेथें **गोपाळरांव** भक्तिपरायण होते हें वाचकांस आश्चर्यकारक वाटेल असें म्हटलें आहे. ईश्वराविषयीं जी भक्तिपरायणता ती सुद्धां ईश्वर म्हणजे सर्व जगाचा पिता, सर्व जगाचें आदिकारण व आपण त्याचीं अज्ञ मुलें, तो आमचें सदां कल्याण करितो अशा सारख्या विचारांनीं उत्पन्न होते. **गोपाळरावजी** नास्तिक होत, निदान ते इतर आस्तिकांप्रमाणें सगुण अथवा निर्गुण देव मानून त्याच्या काल्पनिक चित्राची पूजा अगर त्याचें ध्यान करीत नसतील; तरी या सृष्ट पदार्थांमध्यें एक कांहीं तरी नियामक तत्व आहे असा त्यांचा पूर्ण विश्वास होता; तो विश्वास आंधळा नव्हता; शास्त्रीयरीत्या प्रमाणसिद्ध होता. हें नियामक तत्व शोधून पूर्णपणें ओळखण्याचा प्रयत्न करीत असणें हेंच त्या भक्तिपरायणतेचें रूप. याकरितांच **गोपाळरावजीं**च्या अंगीं भक्तिपरायणता होती असें विधान वर केलें आहे. ज्याच्या त्याच्या बुद्धि-प्रागल्भ्यानुरूप ज्यानें त्यानें विचार करून सत्यास न सोडतां पूज्यबुद्धि बाळगावी.

**गोपाळरावजीं**च्या अंगचा दुसरा अनुकरणीय गुण निस्पृहता हा होय. विशेष हाव न धरितां लोककल्याणाकरितां पूर्ण विचाराच्या अंतीं जें कार्य हातीं घेतलें त्यांत कितीहि अडचणी आल्यातरी तें पार पाडण्याकरितां झटणें व मोहांत गुंतावयाचें नाहीं असा **गोपाळरावजीं**चा स्वभाव होता. स्वार्थ साधावयाचा असता तर **गोपाळरावां**स तसें करितां आलें असतें. पण स्वार्थत्याग हा त्यांच्या विचारांत पूर्णपणें आरंभींच खिळला होता. हें त्यांनीं आपल्या आईस पाठविलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें. पुढें त्यांनीं **होळकरमहाराजानें** आमंत्रण स्वीकारिलें नाहीं यांत विशेष नाहीं. जर त्यांनीं स्वीकारलें असतें तर मात्र त्यांजकडे जास्त दोष आला असता.

तिसरा गुण सत्यप्रीति आणि देशाभिमान. हे दोन गुण एकाच ठिकाणीं घेण्याचें कारण सत्यप्रीति शिवाय जो गुण तो सर्वथैव खराब. आणि आजकाल देशाभिमानामध्यें सत्यप्रीतीचें अंग आमच्या दुर्दैवानें अत्यंत अल्प आहे. थोर गृहस्थांची अल्प संख्या सोडून

दिली असतां देशाभिमानाला वाकडेंतिकडें वळण लागलेले व लावणारेच लोक जिकडे तिकडे दिसतात. त्यांच्या मतीं आपल्या देशांतलें ह्मणून जें जें कांहीं असेल तें तें उत्तम ह्मणणें व तदनुसार वर्तन करणें हाच देशाभिमान; व देश शब्दाचा अर्थही होतां होतां इतका आकुंचित झाला आहे कीं देश आणि विवक्षित प्रांतांतली विवक्षित जात यांच्या सीमा एकच. असला देशाभिमान **गोपाळ-रावजींच्या** अंगीं वसत नव्हता हें अगदीं खरें आहे व ह्मणूनच त्यांस अपशब्द व अपकृति यांचा चांगला अनुभव आला आहे. त्यांचा देशाभिमान म्हणजे अफाट **हिंदुस्थान** जें आज एक छत्राखालीं आलेलें आहे त्यास ऊर्जित दशा येऊन तें इतर राष्ट्रां-बरोबर चढाओढींत कधींही हार जाणार नाहीं अशी त्यास स्थिति प्राप्त होण्यास जी सामग्री पाहिजे ती आपल्या देशांत असेल तर तिचा अभिमान धरून तिच्या अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करणें आणि जी नसेल तिच्याबद्दल स्पष्टपणें बोलून ती आणण्याचा प्रयत्न करणें हा होय.

याशिवाय उद्योगशीलता, दृढनिश्चय, धैर्य, व काटकसर हे त्यांच्या अंगीं वसत होते व त्यांचें अनुकरण प्रत्येक मनुष्यानें केलें पाहिजे. त्यांची विद्याभिरुचि व कर्तव्यदक्षता कांहीं विलक्षण होती. अमुक माझें कर्तव्य आहे असा एकदां कां त्यांचा विचार झाला म्हणजे तें करण्यामध्यें महासंकटें आलीं तरी त्यांत रतिभरही चुकावयाचें नाहीं. अध्ययन व अध्यापन यांत जें त्यांनीं आपलें सर्व आयुष्य खर्चिलें ह्यावरून त्यांची विद्याभिरुचि स्पष्ट होते. दम्यामुळें अलीकडे अलीकडे त्यांस वाचन वगैरेचा नाद बराच कमी करावा लागला होता. **गोपाळरावजींचें** वाचन म्हणजे विशेष विस्तृत होतें असें नाहीं. त्यांच्या पेक्षां अधिक पारायणें केलेलें व अधिक पुस्तकें अथपासून इतिपर्यंत वाचीत गेलेले पुष्कळ लोक सांपडतील. पण **गोपाळरावजींना** पहिल्यापासून विचार

करण्याचा नाद जास्त होता. जें काय वाचलें त्याचें मनन करून सत्यासत्यतेच्या कसोटीस लावून पहावयाचें अशी त्यांस संवय होती; तरी पण कोणतेंही पुस्तक वाचीत असतांना ग्रंथकार काय म्हणतो हें पुरतेपणीं न पहातां त्या ग्रंथकाराचीं मतें जर आपल्या मतांशीं जुळत नसतील तर एकसारखा त्या ग्रंथकाराशीं अगर वाचणाऱ्या सोबत्याशीं वाद घालीत बसून वेळ गमावणें व शेवटीं त्या ग्रंथकारासंबंधानें आणि त्या सोबत्यासंबंधानें दुर्ग्रह करून घेणें त्यांस कधींही आवडत नसे.

अध्यापन हा विद्याभिरुचीचा दुसरा प्रकार होय. लोकशिक्षण हेंच इष्टप्राप्तीचें म्हणजे देशोन्नतीचें मुख्य साधन हें त्यांचें ठाम मत होतें व म्हणूनच त्यांनीं शिक्षणाचें काम हातीं घेतलें होतें. पुढील पिढीस द्यावयाचें शिक्षण शाळा व कॉलेज यांत मुख्यद्वारा होत असे. **गोपाळरावजी** शिक्षकाचें काम कर्त्तव्य म्हणून करीत असत इतकेंच नाहीं, तर तें त्यांना अत्यंत प्रिय होतें म्हणून करीत असत. शिक्षक असतांना भारवाहक न बनतां विद्यार्थ्यांचें मन व बुद्धि विकसीत कशीं होतील, त्यांस सत्याची गोडी लागून खरा व योग्य विचार करण्याची शक्ति कशी येईल इकडे त्यांचें सर्व लक्ष्य असे. त्यांनीं केवळ पुस्तकांतील वाक्यांचा अर्थ सांगण्याचेंच काम कधीं केलें नाहीं; यापासून काय शिकावें हें प्रत्यक्ष जरी त्यांनीं कधीं सांगितलें नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें तें विद्यार्थ्यांच्या मनावर चांगलें ठसेल अशी त्यांची शिकवण्याची हातोटी असे. वर्गांत शिकवित असतांना ते पुस्तकाबाहेर जात खरे, तरी पुस्तकास सोडून विशेष दूर जाऊन कोणाच्या तरी टवाळक्या करीत बसणें किंवा निरुपयोगी अगर दुरुपयोगी माहिती देऊन विद्यार्थ्यांचीं मनें कोत्या समजुतींचीं व कचऱ्याच्या पेटीप्रमाणें त्यांनीं कधींच केलीं नाहींत.

चालू पिढीस शिक्षण देण्याचें काम वर्तमानपत्रद्वारा त्यांनीं आमरणांत केलें. वर्तमानपत्रांतील त्यांचे लेख सुविचार-प्रचुर, उत्तम

उत्तम माहितीनें भरलेले, मुद्देसूत, निर्भीड असे असत; व भाषाशैलीही भारदस्त, सुंदर, स्पष्ट, व प्रसंगास साजणारी अशीच असे. विषयप्रतिपादनांत विरुद्ध पक्षाची तात्काल फजिती उडवण्याचीही त्यांस हातोटी उत्तम साधली होती. एकदां आपला मुद्दा योग्य आहे इतकें ठरल्यावर मग ते भाषेला वाटेल तशी नटवून वाचकांचीं मनें आकर्षण करून घेण्यास व त्यांस आपले दास करून टाकण्यास तिला सहज समर्थ करीत. जेथें मुद्दा खोटा असेल तेथें मात्र डावपेंच लढवून आपलें तर्कट शास्त्र प्रकट करण्याची त्यांस अतिशय चीड येत असे. या त्यांच्या लेखनपद्धतीमुळें कोणत्याही विषयावर जरी त्यांनीं लिहिलें तरी तो विषय लोकांच्या मनावर उत्तम तऱ्हेनें ठसत असे. **गोपाळरावजींनीं** कधींकधीं लोकांस अत्यंत अप्रिय व कधींकधीं घाणेरडे, आणि कधींकधीं जिव्हाळ्यास लागणारे व राग येण्यासारखेही लेख लिहिले आहेत, पण त्या योगें वाचक नाखुष कधींही झालेले नाहींत. त्यांच्या लेखांत लोकांस नवीन वळण लागण्यासाठीं कधींकधीं मुद्दाम आणलेला क्रोध तर कधींकधीं प्रेम; पण नेहमीं सहनशीलतापूर्वक बोध अगर कानउघाडणी दृष्टीस पडते. सारांश सुविचारी आईबाप, अगर गुरु आपल्या लेकरांस अगर शिष्यांस वळण लावण्याकरितां जी प्रेमपुरस्सर खटपट करितात तीच लोकांना शिक्षण देण्याच्या अर्थात् वळण लावण्याच्या कामीं **गोपाळरावजी** करीत होते. **गोपाळरावजींना** लेखनाची व वक्तृत्वाची गोडी फार लहानपणापासूनच होती. अगदीं लहानपणीं **कऱ्हाडांत** असतांना निबंध लिहून त्यांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत; तसेंच **वऱ्हाडांत** पहिल्या वक्तृत्व समारंभात त्यांनीं बक्षिस मिळविलें आहे व तेथें शाळेमध्यें असतांना यांणीं नाना विषयांवर भाषण केलें आहे व लेख लिहिले आहेत. कॉलेजांत आल्यावरही पुण्याच्या वक्तृत्व समारंभांत त्यांनीं बक्षिस मिळवलें आहे व **डे. कॉ. ग्यादरिंगनें**


दिलेल्या विषयावर यांच्याच निबंधास बक्षिस मिळालें आहे. पण त्यांच्या जन्माच्या सोबत्यानें—दम्यानें—त्यांच्या वक्तृत्वाचा लाभ लोकांस घेऊं दिला नाहीं व लोकशिक्षणाचें हें त्यांच्या ताब्यांतील तिसरें साधन त्यांस नाहींसें केलें. **गोपाळरावजी** मराठी तर लिहितच असत; व बहुतेक त्यांचे लेख मराठींतच आहेत. तरीही त्यांना इंग्रेजी लिहिण्याचीही संवय होती. कधींकधीं ते इंग्रेजी लिहीत असत.


आणखी दोन गुण **गोपाळरावजीं**पासून तरुणांनीं अनुकरण करण्यासारखे आहेत. ते स्वावलंबन व सहिष्णुता. लहानपणापासून **गोपाळरावजींस** स्वावलंबनाची संवय लागली होती. योग्य तऱ्हेनें कोणी मदत करील तर ती न घेतां आपणच कोणतेंही काम करूं जाणें हें स्वावलंबन नव्हे; व असलें स्वावलंबन **गोपाळरावजींच्या** अंगीं नव्हतें. तरी जर कोणी मदत केली नाहीं तरी पण आपलें कर्तव्य आपणच करावयाचें व त्यासाठीं लोकांजवळ मदत नाइलाज होईपर्यंत मागावयाची नाहीं; किंवा मदत नाहीं म्हणून कर्त्तव्य टाकावयाचें अगर टाळावयाचें नाहीं; हें-खरें-स्वावलंबन **गोपाळ-रावजींच्या** अंगीं पूर्ण वसत होतें. सहिष्णुता हा गुण **पुण्या**मध्यें एका अत्युच्च माणसामध्यें जसा व्यक्त दिसतो तसाच तो **गोपाळ-रावजीं**मध्येंही दिसत होता. अयोग्य गोष्टीबद्दल राग न येणें म्हणजे तो मनुष्य मानव या पदवीस योग्य नव्हे; पण जरी राग आला तरी दुसऱ्याचें मुद्दाम आपण होऊन नुकसान करूं जाणें अगर करविणें किंवा सूड उगवणें हीं कामें सहिष्णुतादर्शक नव्हत; व असल्या कृत्यापासून **गोपाळराव** पराङ्मुख होते हें त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट आहे. आपली बाजू स्पष्टपणें लोकांपुढें मांडणें व दुसऱ्याची बाजू खोटी असली तर तिचा निषेध करणें हें सहिष्णुतेला बाधक नव्हे; व तसें **गोपाळरावजी** करीत असत. शिवाय इतरांनीं त्यांच्या मूर्खपणामें, अहंपिशाच्च-बाधेनें, आपला कितीही छळ केला

तरी त्याबद्दल विशेष राग न येतां तो सहन करणें हें **गोपाळरावजींच्या** वर्तनांत खिळलेलेंच होतें. **पुण्याच्या** लोकांस याचा पूर्ण अनुभव आहे. कोणी आपल्या हयातींत आपणांस पिंड देवोत, कोणी जिवंतपणीं प्रेत स्मशानांत नेवोत, कोणी दगडमार करोत, अगर कोणी तुम्हांस ठार करूं अशीं पत्रें पाठवोत; त्या सर्वांस न डगमगतां, न जुमानतां व न रागावतां त्यांनीं आपलें कर्तव्य बजाविलें.

शेवटीं **गोपाळरावजींचें** अलौकिक तेज या सर्व गुणांच्या व कर्तबगारीच्या मुळाशीं आहे हें कोणी विसरूं नये; पण तें तेज जरी अनुकरणानें अंगीं येणारें नसलें तरी ज्या मानानें तेज असेल त्या मानानें, अनुकरण करण्यासारख्या गुणांचें अनुकरण केलें असतां, ते गुण आपल्यामध्यें विकास पावतील हें पूर्णपणें जाणून तरुणांनीं त्यांचें अनुकरण केल्यास चरित्रवाचनापासून त्यांनीं लाभ करून घेतलासें होईल, व लेखकाच्या श्रमाचें सार्थक्य होईल.

समाप्त.






# देशभक्त व स्वधर्माभिमानी करितांच.

# हिंदु प्राईज वॉचेस.

**हिंदु वॉच.** दिखाऊ, टिकाऊ, मजबूत, वजनांत हलकीं, मध्यम आकाराचीं, बरोबर वेळ दाखविणारीं असून पांढरे मिन्याचे डायलवर निरनिराळे हिंदु पूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. मध्यभागीं **श्रीशंकर पार्वतीसह** असून कांहींवर **श्रीशिवाजी माहाराज** दरबारी थाटानें व अश्वरूप सशस्त्र आहेत. रोमन व मराठी स्पष्ट आकड्यांमध्यें **श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमान, रामसीता, लक्ष्मीनारायण, विठ्ठल रखमाई, गौरीशंकर, देवी, कृष्ण, दत्तात्रय,** असे १७ पासून २२ पर्यंत नेत्रांस व मनास समाधान देणारीं हिंदुदेवतांचीं प्रेक्षणीय चित्रें आहेत. किंमतही माफक आहे. हें वॉच एकवार घेतल्यास १०, २०, वर्षें दुसरें घ्यावयास नको.

हिंदु नि. सि. वॉच किंमत रु० १० ग्यारंटी १ वर्ष. हिंदु लिव्हर नि. सि. वॉ. किं. रु० १५ ग्या. २ वर्षे. हिंदु लिव्हर चांदीचें वॉच किं. रु० २५, ३०, ग्या. ३, ४ वर्षे. हिंदु सोन्याचें वॉच किं. रु० १००, १२५ ग्या. ३, ४ वर्षे. प्याकिंग पोस्टेज निराळें. वॉच बरोबर एक शेडा, स्प्रींग, कांच पेटी मिळेल. व्हीं. पी. पार्सलनें पाठवूं. सचित्र क्याटलाग फुकट. सर्व प्रकारचीं वॉच रिपेरचीं कामें माफक दरानें ग्यारंटीसह करून देऊं.

**जी. बी. नाईक आणि कंपनी,**

**भायखळा, मुंबई व पुणें.**

# गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रियकृत

## अचूक गुणकारी औषधें.

पुणें येथील स० १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत



औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणांबद्दल सर्टिफिकेटें [दाखले] मिळाले आहेत.

**ज्वरांकुश** ( तापावर रामबाण )–तीन दिवसांत हटकून हिंव-ताप व पाळीचे ताप जातात. किं. १ रु. ट. ख. १ आणा.

**जुलाब, पोटदुखी व पटकी बंद करण्याचें औषध**–प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें. किं. १२ आणे ट. व बं खर्च ८ आणे.

**शक्तीवरील गोळ्या**–नंबर १, बलवर्धक, शक्तिवर्धक, पौष्टिक इ० विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो० रु० ३॥ ट. व बं. खर्च ७ आणे.

**कापाळशूळ व अर्धशिशीवर**–पांच मिनिटांत गुण. किं. रु. १॥ ट. व बं. खर्च. ८ आणे.

**शक्तीवरील गोळ्या**–नंबर २, सुस्तीवर, पानथरीवर, मुलांचे डब्यावर व आफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु. १ ट. व बं. खर्च ७ आणे.

**केस काळेभोर करण्याचा कलप**–किं रु. १। ट. व बं. खर्च ११ आणे.

**रक्तपितीवर रामबाण**–किं. रु. ६ ट. व बं. ख. १ रु. ५ आ.

**खोकल्यावर गोळ्या**–किं. १२.आणे ट. व बं. ख. ७ आ.

**गजकर्ण व खरजेवर मलम**. किं. ६ आणे ट. व बं. ख. तीन डब्यांपर्यंत ७ आणे.

**वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय,**
१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्टआफिसाचे समोरच,
**मुंबई.**